काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद, नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर, (राज मोहौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड
7972872112
EYE Q MEDIA





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. ०३.१२.२०२४ | अंक नं. २३० | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहांबाबतच्या तक्रारीची चौकशी करण्याचे प्रशासनाला आदेश

## ठेकेदाराच्या मनमानीविरोधातील उपोषण स्थगित

नगर - समाजकल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतीगृहासंदर्भात आलेल्या तक्रारींची चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी समाजकल्याण अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू केलेले उपोषण मागे घेण्यात आल्याची माहिती उपोषणकर्ते राजू वैराळ यांनी दिली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतीगृहातील आहारासह सोयी सुविधांबाबत ठेकेदाराकडून मनमानी सुरू असून, त्याबाबत कारवाईच्या मागणीसाठी राजू वैराळ यांच्यासह विनायक गोरखे, भगवान गवते, राजेंद्र निकम, प्रकाश थोरात आदींनी ३ डिसेंबर रोजी सकाळपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची तात्काळ दखल घेत जिल्हाधिकारी यांनी वसतीगृह संदर्भातील मागण्या आणि उपोषणकर्त्यांनी केलेल्या तक्रारीबाबत कार्यवाहीचे आदेश काढले आहेत.



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसलेले राजू वैराळ व त्यांचे सहकारी. (छाया - अमित मन्यार)

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात वैराळ यांनी म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुला, मुलींचे शासकीय वस्तीगृहात विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जाते. तसेच शासनाने घालुन दिलेल्या नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांना दैनंदिन केळी व सफरचंद दिली पाहिजे परंतु केवळ केळी दिली जाते पण एकच. तसेच दुधामध्ये कायमस्वरुपी पाण्याचे प्रमाण जास्त असते. शासनाच्या नियमानुसार आठवड्यातून एकदा मटण व एकदा चिकन दिले जावे, असे निर्देश असतांना देखील विद्यार्थ्यांना केवळ चिकनच दिले जाते. विद्यार्थ्यांच्या रुममध्ये साफसफाई नसल्याकारणाने रुममध्ये, अंथरुणात तसेच कधी कधी जेवणात देखील झुरळ आढळून आले आहेत. अनेकवेळा विद्यार्थ्यांनी वसतीगृहाच्या अधिक्षकांना तसेच सहाय्यक आयुक्त, अहमदनगर यांना लेखी स्वरुपात कळवून देखील कोणत्याही प्रकारे सुधारणा अगर कारवाई करण्यात आलेली नाही. अधिक्षक स्वतः म्हणतात की, ठेकेदार हा जेवणाची व फळांची सुविधा देत नाही, त्याला आम्ही काय करणार. तुम्ही शिकायला आलात का इथे खायला आलात, असे उर्मट प्रश्न करतात. वसतीगृहांचे अधिक्षक हे निवासी असतांना देखील ते शहराच्या ठिकाणी राहतात व आठवड्यातून दोन वेळेस ते नियुक्तीच्या ठिकाणी म्हणजेच वसतीगृहाच्या ठिकाणी जातात. याबाबत लेखी स्वरुपात तक्रारी देवुन देखील त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. शासनाने मुली व मुलांकरीता वसतीगृहात स्वतंत्र अशी जागा उपलब्ध करून त्यावर प्रशासकिय इमारत उभारून तेथे नव्याने सर्व सोयी सुविध उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही. या प्रश्नाकडे जातीने लक्ष घालुन शासनाकडे पाठपुरावा करून सदरील प्रश्न मार्गी लावावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# 'आधार'च्या खाजगीकरणा विरोधात नगर जिल्ह्यातील केंद्र चालक 'हायकोर्टात'

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये मागील तीन ते चार वर्षापासून एकात्मिक बालविकास प्रकल्पाचे आधार नोंदणीचे काम हे शासकीय कंपनी महा आय टी या कंपनी मार्फत सुरळीत सुरू होते, परंतु मागील तीन ते चार दिवसापूर्वी आयुक्त महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र राज्य यांनी एक परिपत्रक काढून सर्व आधार नोंदणी संच हे दोन दिवसात एका खाजगी कंपनीला जमा करण्याचे आदेश काढले. याविरोधात अहिल्यानगर जिल्ह्यामधील सर्व आधार नोंदणी चालक एकवटले असून त्याविरोधात सर्व आधार नोंदणी चालक यांनी औरंगाबाद हायकोर्टमध्ये याचिका दाखल केली आहे

वास्तविक महा आय टी मार्फत मागील तीन वर्षामध्ये आधारचे काम सुरू असताना सदरील ६९ आधार केंद्र धारक यांनी शासनाकडे पन्नास हजार रुपये इतकी रक्कम आधार केंद्र चालवणे पोटी अनामत रक्कम जमा केली आहे. या ६९ लोकांचे लाखों रुपये शासनाकडे पडून आहे असे असताना सुद्धा व महा आय टी या कंपनीचा शासनासोबत असलेला करार अद्याप संपलेला नाही. तरी सुद्धा आयुक्त महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र राज्य यांनी परस्पर सदरील आधार संच जमा करणेबाबत आदेश पारित केले आहे. यामध्ये कुणाचा व्ययक्तिक आर्थिक फायदा आहे का हे सुद्धा शोधणे आता गरजेचे आहे आयुक्त महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र राज्य यांनी आदेश पारित करणे अगोदर शासनाची परवानगी घेतली का? याबाबत सुद्धा माहिती उपलब्ध नाही तरी सदरील आदेशाला स्थगिती मिळावी म्हणून जिल्ह्यातील सर्व आधार केंद्र धारक यांनी उच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे, अशी माहिती शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे उत्तर नगर जिल्हाप्रमुख व जिल्हा संपर्कप्रमुख -माहिती अधिकार कायदा कार्यकर्ता महासंघ राहाताचे जितेंद्र जाधव यांनी दिली आहे.



## रस्त्यावरील खड्डा ठरतोय नागरिकांसाठी जीवघेणा

शहरातील मध्यवर्ती भाग असलेल्या प्रभाग क्रमांक ११ मधील नुकताच कॉंक्रिटीकरण झालेल्या नालबंदखुंट चौक ते पिरशाहखुंट चौक या रस्त्यामध्ये मोठा खड्डा पडला असून तो वाहतुकीच्या दृष्टीने धोकादायक ठरत आहे. *(वृत्त पान ७ वर)*

# शहरातील काही भागात पहाटे वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांसमोर अनेक अडचणी

## वीजपुरवठा सुरळीत न केल्यास महावितरणविरोधात आंदोलन उभारणार : कॉंग्रेसचा इशारा

नगर - महावितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे शहराच्या काही भागात पहाटेच्या वेळी वारंवार वीजपुरवठा खंडित केला जातो. तर काही वेळा वीज असूनही ती कमीदाबाने पुरवठा होत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पहाटेच्या वेळी पाणी सोडले जाते. अशावेळी वीजपुरवठा खंडित केल्यास माता-भगिनींना पाणी भरण्यास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत तातडीने दखल घेऊन पहाटेच्या वेळचा वीजपुरवठा सुरळीत करावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अहमदनगर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे महासचिव इमरान बागवान यांनी दिला आहे.

यासंदर्भात महावितरणच्या अभियंत्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग ११ मधील हातमपुरा, धरतीचौक, काळूबागवान गल्ली, हलवाई गल्ली, पारशा खुंट या भागात नेहमीच पहाटे ५ ते ७ या दरम्यान वीजपुरवठा खंडित केला जातो. या भागात पिण्याचे पाणी सुटण्याची वेळ पहाटेची आहे. या भागातील ७-८ हजार लोकांना याचवेळी महापालिकेकडून पाणी सोडले जाते. साडेपाच ते साडेसहा या वेळेत हे पाणी सोडले जात असून, याचवेळी वीजपुरवठाही खंडित केला जातो. काहीतरी तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याचे महावितरणकडून सांगण्यात येते. त्यामुळे या भागातील महिला, नागरिकांना पाणी भरण्यासह विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तरी महावितरण कंपनीने पहाटेच्या वेळी वीजपुरवठा खंडित होणार नाही याची दखल घ्यावी अन्यथा पक्षाच्यावतीने मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा बागवान यांनी दिला आहे.

### वीज खंडित होत असल्याने महिलांमध्ये संतप्त भावना

वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने गृहिणींकडून संाप व्यक्त होत आहे. आज घरातील सर्व कामे विजेच्या उपकरणांवर केली जातात. स्वयंपाकापासून ते पाणी गरम करण्यापर्यंत सर्वच कामासाठी विजेचा वापर केला जातो. मात्र तासन्तास वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने गृहिणींना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. महावितरणचे अधिकारी तक्रारींची दखल घेत नसल्याने महिला, गृहिणींमधून संताप व्यक्त होत आहे. शहरातील ठराविक भागातच नव्हे तर सर्वत्रच विजेचा हा खेळखंडोबा सुरू असून, थंडीच्या दिवसात विजेची मागणी कमी असतानाही वीजपुरवठा सुरळीत का होत नाही, असा सवाल केला जात आहे.


वरदग्रीन्स रिसॉर्ट
शुद्ध शाकाहारी
निसर्गरम्य वातावरणात हुरडा पार्टी
बुकींग आवश्यक





निसर्गरम्य वातावरणात कवळा लुसलुशीत हुरडा सोबत नाष्टा, जेवणाची हायटीची उत्कृष्ट व्यवस्था
* जेवणासाठी प्रशस्त ओपन हॉल/लॉन
पत्ता : मु.पो. चास, आर.आर. एच.पी. पेट्रोल पंप मागे, नगर-पुणे रोड, अहमदनगर.
संपर्क सौरभ संकलेचा 9637539797


## जाहीर नोटीस

**तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. दिगंबर मारूती साळुंके यांचे पुर्वज नामे कै. भवानी साळुंके उर्फ धिसाडी, कै. भैरू (बहिरू) भवानी साळुंके उर्फ धिसाडी व कै. मारूती भैरू साळुंके उर्फ धिसाडी यांच्या मालकीच्या मिळकती अहिल्यानगर (अहमदनगर) येथील कॅन्टॉन्मेंट क्षेत्र, औरंगाबाद रोड, कोठला, सावेडी, मंगलगेट, कोंडीमामा चौक, माळीवाडा, केडगाव, नालेगाव, राहुरी घोडेगाव रोड व इतर ठिकाणी, तसेच पुणे जिल्हयातील शिरूर या गावामध्ये असून सदरील मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. सदरील मिळकती खालील फोटोंमध्ये दर्शविलेले इसम नामे १) श्री. वसंत सहादू साळुंके, २) श्री. सुरेश सहादू साळुंके, ३) श्री. चंद्रशेखर किसन साळुंके व ४) श्री. नितीन किसन साळुंके परस्पर खोटयानाटया कागदपत्रांच्या आधारे एकटे मालक असल्याचे भासवून हडप व गिळंकृत करून तिऱ्हाईत इसमांची दिशाभूल करून आमचे अशिलांचे परस्पर हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्याकामी आमचे अशिलांनी सदर इसमांविरूद्ध पोलीसांत फिर्याद अर्ज दिला होता. सदर प्रकरणी सदर फोटोंमध्ये दर्शविलेले इसम पोलीस स्टेशनमध्ये हजर होऊन त्यांनी सदर मिळकतींबाबत कुठलाही व्यवहार केला नसल्याचा पोलीसांना जबाब दिला आहे. या उपर सदर मिळकतींबाबत खालील इसमांशी कोणीही कुठलाही व्यवहार केला असल्यास सदरचा व्यवहार हा मूळत: बेकायदेशीर राहिल. त्यामुळे खालील इसमांशी कोणीही करार, मदार, दान, घान, लिज, लिन, ट्रान्सफर, खरेदी विक्री, कुलमुखत्यारपत्र, विकसनकरारनामा इत्यादी करू नये. जर कोणी वरील इसमांशी आमचे अशिलांचे संमती शिवाय कुठलाही व्यवहार व करारमदार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व सदरचा व्यवहार बेकादेशीर व रद्द समजण्यात येईल.**

**सबब सदरील जाहीर नोटीस दिली असे.**

**अहिल्यानगर**
**दि. ०३/१२/२०२४**

**ॲड. मयुर दिगंबर साळुंके**
**फ्लॅट नं. ८, सत्यराज क्लासिक बिल्डींग,**
**सिटीएस २८९, शुक्रवारपेठ, पुणे ४११००२.**
**मोबाईल ९११५८७४७३९**



श्री. सुरेश सहादू साळुंके



श्री. नितीन किसन साळुंके



श्री. चंद्रशेखर किसन साळुंके



श्री. वसंत सहादू साळुंके


१३०० स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे आहे
मार्केटयार्ड येथे सर्वसोयींनीयुक्त पहिल्या मजल्यावर १३०० स्क्वे. फूट गाळा, पतसंस्था, ऑफिसेस, दवाखाना, क्लाससाठी भाडेतत्वावर देणे आहे.
9890398098

व्हिडिओ एडिटर पाहिजे
यु ट्युब चॅनल करिता व्हिडिओ एडिटर पाहिजे
इंस्टाग्राम व फेसबुक इत्यादी विषयी माहिती आवश्यक
चॅनलसाठी न्युज ॲन्कर पाहिजे (महिला/पुरुष)
91 12 13 14 15

फ्रेश स्टॉक
महावीर मॉल... स्वस्त परंतु चांगले कपडे खरेदी करणाऱ्या ग्राहकांनीच कृपया मॉलला भेट द्यावी.
जेन्टस-लेडीज स्वेटर, जर्किन, हुडी, अप्पर, मफलर, हॅंड ग्लोज, उलन कॅप सर्व साईझमध्ये आणि होलसेल दरात..
इंपोर्टेड ब्लॅंकेट ४०० रु. किलो प्रमाणे




मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बॅंके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## तरल प्रेमकवितांचा रसास्वाद - चंद्रोत्सव

वाचनीय मननीय – प्रेरणादायी अक्षर धन – संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

सध्याचे आघाडीचे लेखक साहित्यिक व सृजनशील मनाचे प्रवीण दवणे यांनी केलेल्या विविध मान्यवरांच्या प्रेमकवितांचा रसास्वादाचा अनुभव 'चंद्रोत्सव' पुस्तक वाचताना येतो.

सर्वश्रेष्ठ उत्कट प्रेमकवितांनी आपली सुखदुःखे प्रेममय केली आहेत. प्रीतीभावनेच्या अलौकिक छटांनी, रुक्ष व्यवहारी वाटेवरही इंद्रधनुची तोरणे लावली आहेत. ह्या प्रितीच्या तरल छटा तरी किती अलौकिक! कधी फुलराणीची सलज्जता, तर कधी किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी, कितीदा करू प्रितीची योजना? अशी सूर्याकडे युगानुयुगे अथक प्रार्थना करणाऱ्या पृथ्वीचे समर्पण!

तर कधी तुझ्याचसाठी तुझ्याचसाठी रे! म्हणत दुहेरी खुणगाठी जपणारी मौन व्याकुळता!



अगदी प्रत्येकाने मनात जपलेला हा उत्कट रंगोत्सव! श्रेष्ठ प्रेमकवितांचे सौंदर्यरंग टिपणारे हे सदासतेज ललित लेखन. जीवनावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी जणू उन्हाचे चांदणे करणारा हा प्रसन्न चंद्रोत्सव!

मराठीतील ज्येष्ठ, श्रेष्ठ कवितांनी आपले जगणे सुंदर केले आहे. त्यातही प्रेमकवितांनी तर आपल्या व्यवहारी व काहीशा रुक्ष पाऊलवाटेवर सुंदरतेची मखमल पसरवली आहे. जरूर अनुभव घ्या.

# नगर शहरात अनधिकृतपणे 'फ्लेक्स बोर्ड' लावणाऱ्या पाच जणांविरोधात गुन्हे दाखल

## अहिल्यानगर महानगरपालिकेकडून सावेडी उपनगरात कारवाई; प्रभाग अधिकाऱ्यांनी दिली पोलिस ठाण्यात फिर्याद

नगर - महानगरपालिकेची परवानगी न घेता शहरात अनधिकृतपणे फ्लेक्स बोर्ड लावणाऱ्या पाच अज्ञातांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सावेडी प्रभाग समिती अधिकारी बबन काळे यांनी याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दरम्यान, शहर विद्रूपीकरण करणाऱ्या अनधिकृत फ्लेक्स बोर्डवर तत्काळ कारवाई करून बोर्ड हटवण्याचे आदेश प्रभारी आयुक्त प्रशांत खांडकेकर यांनी अतिक्रमण निर्मूलन विभाग व प्रभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत.

प्रभाग अधिकारी काळे यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, २८ व २९ नोव्हेंबर रोजी अतिक्रमण विभागातील अधिकारी आदित्य बल्लाळ तसेच राहुल तनपुरे, दत्तू जाधव, क्षेत्रीय अधिकारी अर्जुन जाधव यांच्यासह मी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शहरातील सावेडी भागात विनापरवाना फ्लेक्स बोर्ड कोठे लावले आहेत याची पाहणी करत असताना गुलमोहर रोड, कांबळे आर्ट, सावेडी या ठीकाणी पाहणी केली असता गुलमोहर फुड मेस ॲण्ड रेस्टॉरंट आठवण घराची शुध्द शाकाहारी जेवणाची या नावाचा विनापरवाना प्लेक्स बोर्डे लावण्यात आलेचे आढळुन आले तसेच सपकाळ हॉस्पीटल चौक मंगल हौसींग सोसायटी जवळ सावेडी या ठिकाणी पाहणी केली असता का रोबोटीक सेंटर या नावाचा विनापरवाना प्लेक्स बोर्डे लावण्यात आलेचे आढळुन आले तसेच नामदेव चौक ते सीटी लॉन रोड लगत रस्त्याच्या डाव्या बाजुस सावेडी या ठिकाणी पाहणी केली असता रोटस फांउडेशन ५ वी ते १० वी, ११वी ते १२ वी JEE - NEET या नावाचा विनापरवाना प्लेक्स बोर्डे लावण्यात आलेचे आढळुन आले. नामदेव चौक ते सीटीलॉन रोड लगत दशरे नगर रोड कॉर्नर सावेडी या ठिकाणी पाहणी केली असता स्नेहकुंज हाइटस स्कीमचे वैशिष्टे प्लॅटची जाहीरात या नावाचा विनापरवाना - प्लेक्स बोर्डे लावण्यात आलेचे आढळुन आले. नामदेव चौक ते सीटीलॉन रोड लगत सावेडी या ठिकाणी पाहणी केली असता युनिकॉन ॲकॅडमी यशस्वी विद्यार्थी शेहबाज सय्यद सर, मंगेश तवले सर या नावाचा विनापरवाना प्लेक्स बोर्ड लावण्यात आलेचे आढळुन आल्याने आम्ही पंचा समक्ष वरील ठिकाणचे लावण्यात आलेले अनाधिकृत प्लेक्स बोर्डची फोटोग्राफी करुन दोन पंचासमक्ष पंचनामा करुन ते प्लेक्स बोर्ड ताब्यात घेवुन फिर्याद देत असल्याचे म्हटले आहे. या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध अधिनियम १९९५ च्या कलम ३ प्रमाणे ५ अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, सोमवारी (२ डिसेंबर) प्रभारी आयुक्त खांडकेकर व उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी मनपात बैठक घेऊन आढावा घेतला. फ्लेक्स बोर्डमुळे होत असलेल्या विद्रुपीकरणाबाबत मुंबई उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल आहे. त्यात न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार खांडकेकर यांनी अहिल्यानगर महापालिकेत अनधिकृत फ्लेक्सवरील कारवाईची माहिती घेतली. शहरात अनेक ठिकाणी विनापरवाना फ्लेक्स बोर्ड लाऊन शहराचे विद्रुपीकरण करण्यात आले आहे. हे अनधिकृत व विनापरवाना फ्लेक्स बोर्ड तत्काळ काढून घ्यावेत, अनधिकृत फ्लेक्स लावणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, असे आदेश खांडकेकर यांनी अतिक्रमण निर्मूलन विभाग व प्रभाग समितीच्या प्रभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत.

## बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याकांवरील अत्याचार थांबविण्यासाठी भारत सरकारने पुढाकार घ्यावा

नगर - बांगलादेशातील हिंदुवर होणारे हल्ले, खून, लूटमार, जाळपोळ, अमानुष अत्याचार हे अत्यंत चिंताजनक व मानवतेला काळीमा फासणारे आहेत. मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी याचा निषेध करते. हे थांबवण्याऐवजी सध्याचे बांगलादेश सरकार केवळ मूक प्रेक्षक राहिले आहे. लोकशाही मार्गाने उठलेला आवाज दाबण्यासाठी बांगलादेशातील हिंदूवर बळजबरी, अन्याय आणि अत्याचार केले जात आहेत.

मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी अहमदनगर भारताच्या पंतप्रधानांना विनंती करते की त्यांनी जागतिक पातळीवर भारताच्या संबंधाचा वापर करून बांग्लादेश सरकारवर दबाव टाकून हिंदूवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी बांगलादेश सरकारला तातडीने कठोर पावले उचलण्यासाठी भाग पाडावे. बांगलादेशातील हिंदू आणि इतर सर्व अल्पसंख्याकांवर होणारे अत्याचार थांबविण्यासाठी प्रयत्न करावे. बांगलादेशातील पीडितांच्या पाठीशी उभे राहून त्यांना पाठिंबा द्यावा, अशी मागणी मेलद्वारे मख़दुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान यांनी देशाच्या पंतप्रधानांकडे केली आहे.

## श्रीरामपुर पोस्टल क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी विजया शहाणे तर उपाध्यक्षपदी रावसाहेब खरात

श्रीरामपुर - श्रीरामपुर पोस्टल को ऑप क्रेडिट सोसायटी लि श्रीरामपुर च्या अध्यक्षपदी विजया शहाणे तर उपाध्यक्षपदी रावसाहेब खरात यांची निवड करण्यात आली. सहकार अधिकारी ए आर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची विशेष सभा संस्थेच्या कार्यालयात झालेल्या संचालक मंडळ सभेत संस्थेच्या नूतन पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी संचालक राजेंद्र विश्वास, शिवाजी चाफे, सागर आढाव, गोरख कांबळे, राधाकिसन पवार, मीरा जगधने उपस्थित होते.



संस्थेचे नूतन पदाधिकारी विजया शहाणे, रावसाहेब खरात यांचा सत्कार करताना सहकार अधिकारी ए आर जोशी, राधाकिसन पवार, राजेंद्र विश्वास आदी.

नूतन पदाधिकारी यांचे निवडीबदल हेमंत खडकेकर अधिक्षक डाकघर, संतोष जोशी, संदीप हदगल, विनायक शिंदे, पोस्टल संघटनेचे महाराष्ट्र व गोवा राज्याचे कार्याध्यक्ष संतोष यादव यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी शैलेश जगताप, विनायक मोहन, गणेश बनकर, अमोल मुळे, अलका खरात, ऋषीकेश मीना, साईनाथ बंडीवार, डॉ. चेतन बाराहाते, राम कुलकर्णी, राजेंद्र पारखे, अक्षय जोशी, संस्थेचे व्यवस्थापक योगेश बोरुडे यांचेसह सभासद उपस्थित होते.

## क्रिकेट खेळताना चक्कर येवून पडल्याने तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

नगर - क्रिकेट मैदानावर खेळताना चक्कर येऊन पडल्याने तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. निहाल बाळासाहेब काळे (वय २७, रा. आशिर्वाद कॉलनी, स्वामी समर्थ मंदिराजवळ, अहिल्यानगर) असे मयत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. १ डिसेंबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास ही घटना घडली. सकाळी क्रिकेट खेळत असताना निहाल काळे यांना अचानक चक्कर येऊन तो मैदानात कोसळले. नातेवाईकांनी त्यांना तातडीने उपचारासाठी आनंदऋषी हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. नगर तालुका पोलीस ठाण्याला माहिती मिळाल्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते आणि तपासी अधिकारी अंमलदार जांबे यांनी घटनास्थळी भेट दिली.

## लोकशाही संरक्षण कायदा आणण्यासाठी शिष्टमंडळ बाबा आढावांच्या भेटीला जाणार

### पीपल्स हेल्पलाईन आणि वकील संघटनांच्या प्रतिनिधींचा पुढाकार, कायद्याच्या मसुद्यासंदर्भात करणार चर्चा

नगर - देशात लोकशाही संरक्षण कायदा आणण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन आणि वकील संघटनांच्या माध्यमातून डॉ. बाबा आढाव यांची भेट घेतली जाणार आहे. जयप्रकाश नारायण यांच्या तोडीचा नेता डॉ. बाबा आढाव यांच्या स्वरूपात असून, लोकशाही वाचवण्यासाठी लोकशाही संरक्षण कायद्याची गरज असल्याने कॉ. बाबा आरगडे, ॲड. रंजना गवांदे, अविनाश पाटील, वकील संघाचे ॲड. अशोक कोठारी, ॲड. विश्वासराव आठरे, पुणे येथे जाऊन पुढच्या आठवड्यात डॉ. आढाव यांची भेट घेऊन सदर विषयावर चर्चा करणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

मतदार अक्कलमारीच्या माध्यमातून मध्यप्रदेश, हरीयाना आणि महाराष्ट्रात मागच्या दाराने सत्ताधाऱ्यांनी सत्ता काबीज केली. त्याच वेळेला ईव्हीएम मशीन बाबत देखील तमाम जनतेच्या मनात शंका आहे. यामुळे देशातील लोकशाहीला धोका पोहोचला आहे. संगमनेर विधानसभा मतदारसंघात माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या विरोधातील उमेदवार कोणालाही माहिती नसताना देखील तो निवडून आला आणि बाळासाहेब थोरात यांचे तालुक्यासाठीचे मोठे कार्य मागे पडले. यातील परिपक्व व लोकशाही ऐवजी देशात दिव्यांग लोकशाही येत असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

देशातील निवृत्त झालेले सरन्यायाधीश त्याशिवाय विविध उच्च न्यायालयातील निवृत्त झालेले मुख्य न्यायाधीश आणि निवृत्त हायकोर्टचे न्यायाधीश आणि देशभरातील नावाजलेल्या वकीलांची मदत घेऊन लोकशाही संरक्षण कायदा अतिशय चांगल्या पद्धतीने आणता येणार असल्याची भावना ॲड. अशोक कोठारी यांनी व्यक्त केली आहे.



डॉ. बाबा आढाव हे महात्मा फुले यांचे अनुयायी आहेत. त्यांनी ५० वर्षांपूर्वी जातीव्यवस्था संपवण्यासाठी एक गाव एक पाणवठा चळवळ चालवली आणि त्याला यश देखील आले. डॉ. आढाव यांचे चारित्र्य अतिशय स्वच्छ आणि कार्यक्षम आहे. त्यांचे वय ९४ च्या आसपास असले, तरी नुकतेच त्यांनी उपोषण केले होते. तर धर्माचे आधारे देशांमध्ये दिव्यांग शासनपद्धती आणण्याचा निषेध केला होता. त्यामुळे देशभरात लोकशाही संरक्षण कायद्याबाबत मोठी आस्था निर्माण झाली आहे. भारतातील लोकशाही आणि शासन पद्धती दिव्यांग कायद्याकडे झुकत आहे आणि त्यातून भारतातील लोकशाही कृष्णविवरात जाण्याची शक्यता असल्याची खंत ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केली.

भारतातील सध्याचे सत्ताधारी धार्मिक बहुमताच्या जोरावर पुन्हा एकदा मनुवादी तत्त्वप्रणालीप्रमाणे दिव्यांग शासन पद्धती लादू पाहत आहे. त्यातून या देशांमध्ये यादवीची बीजे पेरली जात आहे. त्यामुळे मी, माझे, मला ही तमस प्रवृत्ती पूर्णपणे संपवून आम्ही, आमची आणि आम्हाला या राजस प्रवृत्तीला सुद्धा मागे टाकून आपण सर्व, आपणा सर्वांचे आणि आपण सर्वांसाठी अशा स्वरूपात भारतीय संविधानाची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. यासाठी लोकशाही संरक्षण कायदा आणण्याची आवश्यकता ॲड. रंजना गवांदे यांनी व्यक्त केली.

डॉ. बाबा आढाव यांनी लोकशाही बचाव कार्यक्रमाचा भाग म्हणून केलेल्या उपोषणाला संपूर्ण देशात चर्चेचे मोठे स्वरूप आले. मोठ्या कष्टाने मिळवलेल्या देशाचे स्वातंत्र्य सत्तापेंढारी यांनी उभारलेल्या कुबेरशाहीच्या तिजोरीत बंद होऊ नये, यासाठी कार्यकर्त्यांचा अटाकोट प्रयत्न आहे. त्याला समविचारी देशभरातील वकील मंडळी सहकार्य करतील अशी भूमिका ॲड. विश्वासराव आठरे यांनी मांडली आहे.

## सौ. विजया मोरे यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - येथील सौ. विजया भाऊसाहेब मोरे (वय ७५, रा.भुतकरवाडी) यांचे ३ डिसेंबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्यावर नालेगाव अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. दीपक, धनंजय यांच्या त्या मातोश्री होत.

## जयंत (नाना) गांधले यांचे हृदयविकाराने निधन

भिंगार - येथील रहिवासी जयंत (नाना) दत्तात्रय गांधले (वय ४०, रा.विजयनगर चौक, गांधले मळा, भिंगार) यांचे २ डिसेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार मधील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात आई, २ बहिणी, भाऊ, २ भावजय, चुलते, चुलत्या, पुतणे असा परिवार आहे. प्रसाद गांधले यांचे ते छोटे बंधू होत.

## ऋषिकेत वाघमोडे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - येथील ऋषिकेत नारायण वाघमोडे (वय ९२, रा.जेऊरवाडी, ता.करमाळा) यांचे २ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्यावर जेऊरवाडी (ता. करमाळा) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, ३ मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे. संजय व ज्ञानेश्वर वाघमोडे यांचे ते वडील होत.

## द्वापरयुगातील भगवान श्रीकृष्ण अवताराचा जीवन प्रवास दर्शवणारा सुंदर कलाविष्कार...

हिंदू पौराणिक मान्यतेनुसार त्रेता युगानंतरचे द्वापर युग अनेक अर्थांनी मानवी जीवनाला दिशा देणारे आहे. या युगात भगवान विष्णूंचा श्रीकृष्ण अवतार झाला. भगवान श्रीकृष्ण अवतारातील गोकुळ, द्वारका, महाभारत, भगवत गीता म्हणजे परिपूर्ण मानवी जीवनाचा आणि सनातन धर्माचा सार मानला जातो. अहिल्यानगर येथील श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन संचलित सेठ नंदलाल धूत इंग्लिश मिडियम स्कूल व श्री मोहनलाल राम अवतार मानधना ज्युनिअर कॉलेज मध्ये यावर्षीही स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जीवनावरील सुंदर आविष्कार सादर करून कलियुगात द्वापरयुगाची अनुभूती मिळवून दिली.



शाळा इंग्रजी माध्यमाची असली तरी याठिकाणी होणारे संस्कार आणि विद्यार्थ्यांची जडणघडण महान भारतीय परंपरेची नीतीमूल्य रूजवणारी आहेत याची पुरेपूर प्रचीती पुन्हा एकदा समस्त पालकवर्गाला आली. गतवर्षी शाळेत गीत रामायणातील गाण्यातून मंत्रमुग्ध करणारे रामायण जिवंत झाले. यावर्षी भगवान श्रीकृष्णांच्या जन्मापासून ते कुरू क्षेत्रात अर्जुनाला भगवत गीतेद्वारे उपदेश करणारे श्रीकृष्ण पहायला मिळाले.कृष्ण जीवनातील प्रसंगांचं नाट्य, नृत्य, संगीताच्या माध्यमातून अत्यंत मनमोहक दर्शन विद्यार्थ्यांनी घडवले. विद्यालयातील इयत्ता तिसरी ते बारावी पर्यंत ३५१ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेऊन आपल्या कलागुणांनी आणि उत्कृष्ट अभिनयाने सर्वांना द्वापर युगात नेले. देवकी वसुदेव विवाह, बंदी गृहात कृष्णजन्मापासून सुरू झालेला भगवंतांचा जीवन प्रवास, गोकुळातील बाल श्रीकृष्णाच्या लीला, पुतना वध, गोपाल, राधा, गोकुळवासीय, बाल श्रीकृष्णाच्या मुखातील विश्व दर्शन, नटखट श्रीकृष्णाच्या लीला, माखनचोर श्रीकृष्ण, कालिया मर्दन, गोकुळ वासियांना वाचवण्यासाठी गोवर्धन पर्वत करंगळीवर पेलणारे श्रीकृष्ण, रासलीला, होळी, दुष्ट प्रवृत्तीच्या कंस मामाचा वध करणारा श्रीकृष्ण, रुक्मिणी हरण, कृष्ण सुदामा भेट, कुरुक्षेत्रावर कौरव पांडव समोरासमोर युद्धास सज्ज झाले असताना अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करताना त्याला भगवद् गीता उपदेश अशा भगवान श्रीकृष्णांच्या आयुष्यातील प्रसंगाचंविद्यार्थ्यांनी अतिशय जिवंत सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक प्रसंग इतका खुलत होता की उपस्थित प्रत्येकजण दोन अडीच तास देहभान हरपून श्रीकृष्णमय होऊन गेला. वेशभूषा, प्रसंगानुरूप नेपथ्य, संगीत, संवाद असा सर्वच अंगांनी हा कार्यक्रम विलोभनीय ठरला.

विद्यालयाच्या उपप्राचार्या संपदा देशपांडे यांच्या संकल्पनेतून आणि लेखणीतून साकारलेल्या मनमोहक कृष्णलीलांच्या उत्कृष्ट सादरीकरणासाठी प्रा. प्रसाद बेडेकर, शैलेश देशमुख यांनी दिग्दर्शन केले. विद्यालयातील श्रेयकुमार गुंडू, मुग्धा देवकर, रोथेल लोंढे, शिल्पा मुळे, अंजना पंडित, पूजा म्हस्के, प्रतीक्षा येनगंदूल यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मेहनतीतून ही उत्कृष्ट कलाकृती सादर झाली. आपला पाल्य अशा चारित्र्यसंपन्न पिढी घडवणाऱ्या शाळेत शिकतो याचे कृतकृत्य भाव पालकांच्या चेहऱ्यावर पहायला मिळाले. स्नेहसंमेलन खऱ्या अर्थानं विद्यार्थी व पालकांसाठीही समृद्ध करणाऱ्या उपक्रमांसाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य , शिक्षकांचे मनापासून अभिनंदन!

**- प्रतिमा सागर कासवा**
(पालक, श्रीरामकृष्ण एज्युकेशन फौडेशन स्कूल, अहिल्यानगर)

# गृहिणी

## आरोग्य

### थंडी पडली, भूक वाढली पण...

सध्या थंडीचे दिवस आहेत. या काळात मुलांसह अनेकांची भूक वाढते. त्यामुळे नियमित आहाराबरोबरच अन्य खाद्यपदार्थ अतिरिक्त खाल्ले जातात. वातावरण चांगले असल्यामुळे विविध पदार्थांवर ताव मारला जातो. खाताना कुठल्या पदार्थात किती फॅट्स आणि कॅलरीज आहेत, याचा फारसा विचार केला जात नाही. त्यामुळे हिवाळ्यात वजन वाढण्याची भीती असते आणि भविष्यात व्याधींना सामोरे जावे लागू शकते, अशी भीती वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आवश्यक तेच आहारात घ्या.

## पाककला

### काजू कोथिंबीर वडी

**साहित्य :** १ कप बेसन (बेसन), ३० काजू, १/२ टीस्पून हळद पावडर, १ टीस्पून लाल मिरची पावडर, २ हिरव्या मिरच्या, बारीक चिरून, १ टीस्पून चिंचेचा कोळमीठ, चवीनुसार ४ चमचे तेल + शॅलो फ्राय करण्यासाठी, २ चमचे बारीक चिरलेली कोथिंबीर

**कृती :** मिक्सिंग बाऊलमध्ये तेल सोडून सर्व साहित्य एकत्र करा. १ १/२ कप पाणी घाला आणि खूप घट्ट पिठात चांगले मिसळा. एका फ्राईंग पॅनमध्ये मंद आचेवर ४ टेबलस्पून तेल गरम करा. तयार केलेले पीठ घाला आणि मिश्रण एकत्र येईपर्यंत १५ ते १८ मिनिटे सतत ढवळत राहून घट्ट पीठ बनवा. उष्णता काढा. एक लहान ट्रे ग्रीस करा आणि मिश्रण १ इंच जाडसर पसरवा. थंड होण्यासाठी बाजूला ठेवा आणि कमीतकमी ३० मिनिटे वाफ करा जेणेकरून ते सेट होईल. २ इंच चौकोनी तुकडे करा. फ्राईंग पॅनमध्ये तेल गरम करा आणि चौकोनी तुकडे सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत शॅलो फ्राय करा. काढा आणि टिश्यू पेपरवर काढून घ्या.

## वास्तू

### घड्याळ खराब असल्यास

वास्तुनुसार घरात थांबलेले किंवा बंद घड्याळही ठेवू नये. हे वेळेच्या थांबण्याचे संकेत देते. त्यामुळे ते ताबडतोब दुरुस्त करून घ्या आणि घड्याळ खराब असल्यास ताबडतोब काढून टाका.

## सल्ला

जुनी वर्तमानपत्रे घरात ठेवू नयेत. घरात नकारात्मकता पसरते.

## सौंदर्य

हिवाळ्यातही सनस्क्रीनचा नियमित वापर करावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**बुधवार, दि. ४ डिसेंबर २०२४**

**विनायक चतुर्थी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष शुक्लपक्ष, पू.षा. १७।१५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : वैवाहिक जीवनात स्थिती अनुकूल राहील. अधिकारी वर्गाचे पाठबळ मिळेल.

**वृषभ** : अडचणी येण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य कराल. मागील उधारी वसुल होईल.

**मिथुन** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. मातृपक्षाकडून सहयोग मिळेल. व्यवसायात स्थिती सुखद राहील.

**कर्क** : मित्रांची मदत मिळेल. आरोग्याची काळजी बाळगणे आवश्यक राहील. व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील.

**सिंह** : उत्पन्न वाढल्याने आनंद मिळेल. आपला निष्काळजी दृष्टीकोन आज चांगला ठरणार नाही. काही अडचणींनंतर यश मिळेल.

**कन्या** : जर आपणास एका कार्यात वाढ मिळाली तर इतर कार्यात अवनती होणे शक्य आहे.

**तूळ** : धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल सहकार्यांबरोबर प्रतिष्ठा वाढेल.

**वृश्चिक** : अधिक श्रम करावे लागतील. व्यापार-व्यवसाय व आर्थिक अडचणी निर्माण होतील.

**धनु** : शत्रू पक्ष डोके वर काढेल. आनंदाची बातमी मिळेल. सौंदर्यावर धन व्यय होईल. दिवस ठिक राहिल.

**मकर** : वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. सामाजिक क्षेत्रांमध्ये अजून काही विशेष कार्ये होणार नाही. अनुकूल स्थिती मिळेल.

**कुंभ** : एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल. गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल.

**मीन** : नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**शिक्षक** – 'मी तुझा जीव घेईन' याच इंग्रजी भाषांतर कर बरं

**बंड्या** – 'ते इंग्रजी गेलं उडत, तुम्ही मला हात तरी लावून दाखवा बर.

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* जगातील कोणत्या देशास तीन राजधान्यांचे शहरे लाभलेली आहेत? – द.आफ्रिका
* मूमर गडाफी हा कोणत्या देशाशी संबंधित आहे? – लिबिया
* झांबेझी नदीमधील व्हिक्टोरिया धबधबा शोधून काढणारा पहिला युरोपियन कोण होता? – डेव्हिड लिव्हिंगस्टोन
* बुरुंडी हा देश किती साली स्वतंत्र झाला? – १९६२

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०६३ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | ५ | ■ |
| | ■ | ६ | | ■ | ७ | | ८ |
| ९ | | ■ | १० | ११ | | ■ | |
| | ■ | १२ | | | ■ | १३ | |
| | ■ | १४ | | ■ | १५ | | |
| ■ | १६ | | ■ | १७ | | | ■ |
| १८ | | | ■ | | ■ | १९ | २० |
| | ■ | २१ | | ■ | २२ | | |

**आडवे शब्द :-** १) भारताचे एक माजी पंतप्रधान ६) कपट; कट; कारस्थान ७) सूत कातण्याचे चक्र ९) पंख असलेली गोष्टीतील स्त्री १०) छोटा; लघू; सान १२) थोर मनाचा १३) नेहमी; हमेशा १४) दुसरा; पंख १५) ज्याला मृत्यू नाही असा १६) अंत:करणाची जागृत स्थिती; शुद्धी; चैतन्य १७) वस्तुस्थिती; सत्यस्थिती १८) सराव; अभ्यासश १९) साधू संन्यासी २१) नाकात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना २२) दिनकर; रवि; सूर्य

### शब्दगंध क्र. ७०६२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ज | ब | ■ | ■ | ब | ह | र |
| र | ■ | क | ब | र | स्ता | न | ■ |
| विं | चू | ■ | ग | ण | ■ | न | भ |
| द | ल | द | ल | ■ | पो | ■ | ज |
| ■ | ■ | ण | ■ | सा | र | वा | न |
| स | र | का | र | ■ | ■ | डा | ■ |
| पी | ■ | ■ | ब | टी | क | ■ | शि |
| ट | ण | त्का | र | ■ | प | डा | व |

**उभे शब्द :-** १) मनाला आवडलेले किंवा पसंत पडलेले २) वाव; संधी ३) पोलिसांतील एक पद ४) शिंपडणे; शेतीला पाणी देणे ५) फळातील रसाळ भाग; मगज ८) राज्यसभेचा किंवा लोकसभेचा सभासद ११) माला; पराजय; माळ; असफलता १२) मुंज, व्रतबंध १३) एकाच वयाचे १५) शेवट; अखेर; अंत १६) किंमत; भक्ती; दर १७) जेवताना पातळ कालवण ज्यात वाढून घेतात ते छोटे पात्र १८) आठवण; स्मरण २०) किनारा; बाण; काठ; शर; तट

# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जर तुम्ही अपयशाकडे लक्ष दिले नाही तर तुम्हाला यश कधीच मिळणार नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### प्लॅस्टिकचा शोध कसा लागला?

प्लॅस्टिक म्हटल्यावर तुमच्या डोळ्यापुढे कॅरीबॅग, रॅपर्स, खेळणी वगैरे आली असतील. पण जॅकेट्स, कॉर्न फ्लेक्स या गोष्टीही प्लॅस्टिक आहेत असं म्हटलं तर? ह्या सगळ्या गोष्टी पॉलिमरपासून बनतात त्यामुळे शास्त्रीयदृष्ट्या त्यांना प्लॅस्टिक म्हटलं जाऊ शकतं. पण आपण रुढार्थानं ज्याला प्लॅस्टिक मानतो त्याबद्दल विचार करू या. लिओ बेकलंड या अमेरिकन माणसानं पहिलं सिंथेटिक प्लॅस्टिक शोधलं आणि पाहता पाहता या प्लॅस्टिकनं सगळ्याच गोष्टींमध्ये शिरकाव केला. पॉलिस्टेरीन, पॉलिस्टर, पीव्हीसी, पॉलिथिन, नायलॉन या विविध प्रकारच्या प्लॅस्टिकचा शोध लागला आणि झपाट्यानं प्रगत होणाऱ्या औद्योगिक विश्वाला हात मिळाला. १९३० सालाच्या सुमारास पांढऱ्या आणि दुधी रंगाच्या चकाकत्या पांढऱ्या वस्तू बनवता येऊ लागल्या. दुसऱ्या महायुद्धानं प्लॅस्टिकच्या वापराला चालना दिली.

युद्धोपयोगी वस्तूंमध्ये प्लॅस्टिकचा वापर वाढलाच आणि त्यापाठोपाठ काही वर्षांत बाजारात टप्परवेअर, पेट बाटल्यांची चलती झाली. प्लॅस्टिकचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन जैव-विघटनशील म्हणजे बायो-डिग्रेडेबल प्लॅस्टिक पुढे येत आहे, पण त्याचा वापर म्हणावा तितक्या मोठ्या प्रमाणात होताना दिसत नाही.

### गर्वाचे घर खाली

भीम हा सर्वात बलशाली पांडव. त्याला आपल्या बाहुबलाचा गर्व झाला होता. एकदा काय झालं, खांद्यावर गदा टाकून तो ऐटीत चालला होता. वाटेत त्याला एक म्हातारा वानर दिसला. त्याची लांब शेपूट वाटेवर आडवी पसरली होती. भीम म्हणाला, ''अरे तुझं शेपूट आखडून घे. वाटेत काय पसरून बसला आहेस?''

वानर नम्रतेने म्हणाले, ''मला म्हाताऱ्याला ते उचलत नाही. फार लांबलचक आहे ना. तूच उचलून ठेव ना बाबा''

भीम ते उचलू लागला तर ते उचलेचना गदा घालून प्रयत्न केला तरी हलेना. भिमाची दमछाक झाली. त्याने वानराची क्षमा मागितली व म्हणाला,

''तू खरा कोण आहेस? सांग. मला माझ्या शक्तीचा गर्व झाला होता. मी पुन्हा गर्व करणार नाही.'' वानराने आपले खरे रूप प्रकट केले. तो होता प्रत्यक्ष महापराक्रमी राम भक्त हनुमान!

तात्पर्य : गर्व कधी ही करू नये.

## रहमते दर्शन (भाग – १)



### प्रस्तावना

ये शीर्षक, 'तलाश-नूर', 'मंज़िले-नूर' और 'मौजए-नूर' उनकी काव्य क्षमता और आध्यात्मिक जीवन के इसी सफर की विभिन्न मंजिलों की निशानदेही करते हैं। दुनियावी ज्ञान-विज्ञान में उन्होंने रस्मी पढ़ाई बचपन ही में शुरू की थी। उनकी जीवनी लिखने वाले हरीशचंद्र चड्ढा ने उस समय उनके उर्दू की तख्ती लिखने की चर्चा की है। दर्शनसिंह जी की गणना हमेशा अच्छे छात्रों में होती थी। ज्ञान प्राप्त करने का जज़्बा उन्हें विरासत में मिला था स्कूल और कॉलेज में हमेशा प्रथम स्थान पाते रहे। यदि कभी दूसरे नम्बर पर भी आये, तो बहुत कम नम्बर से पीछे होते थे। मैट्रीकुलेशन उन्होंने बहुत अच्छे नम्बरों से पास किया और इसी आधार पर उन्होंने चाहा कि डॉक्टर या इंजीनियर बने, किन्तु उनके पूज्य पिता का हर काम संत सत्गुरु की मर्जी से होता था, इसलिये उन्होंने इसका फ़ैसला अपने गुरु हुज़ूर बाबा सावनसिंह जी महाराज पर छोड़ दिया। दर्शनसिंह अपने पिता के साथ बाबा सावनसिंह जी महाराज की सेवा में उपस्थित हुए और उन्हें उनके अच्छे नम्बरों से पास होने की खुशख़बरी दी गयी। महाराज जी ने शाबाशी देते हुए प्यार से पीठ थपथपायी। संत कृपालसिंह ने दीनता के भाव से अपने गुरु से पूछा, अब आगे इनको कौन-कौन से विषय पढ़ने चाहिए। उन्होंने कहा, काका (बेटे) फ़ारसी बड़ी मीठी भाषा है और तसौउफ़ की अधिकाँश शिक्षाएँ इसी भाषा में है, इसलिये फारसी भाषा और साहित्य का अध्ययन बहुत ज़रूरी है।

अंग्रेज़ी और गणित अनिवार्य विषय हैं। ऑप्शनल में एक तो फारसी हुई, दूसरा इतिहास ठीक रहेगा। वह बालक दर्शन, जो डॉक्टर या इंजीनियर बनने का स्वप्न देख रहा था, कला का विद्यार्थी हो गया और उनके विचार तसव्वुफ़ के साथ-साथ साहित्य और इतिहास से भी जुड़ गये। प्रेम और सौंदर्य मिला ।) जब दर्शनसिंह जी पंजाब यूनीवर्सिटी में बी.ए. में पढ़ रहे थे, वहाँ उर्दू और फारसी के मशहूर साहित्यकार और शायर प्रोफेसर सूफ़ी गुलाम मुस्तफा 'तबस्सुम' और अंग्रेज़ी के प्रोफ`सर एरिक डिकेन्सन् जैसे मशहूर अध्यापकों के वे सम्पर्क में आये। दर्शन इन दोनों के अति प्रिय छात्र थे। सूफ़ी गुलाम मुस्तफा 'तबस्सुम' की सोहबत में पढ़ाई लिखाई के अलावा उनमें साहित्य और शायरी में भी रुचि पैदा हुई। थोड़े ही दिनों में इस मैदान में इतना बढ़ गये कि उनकी ग़ज़लें पत्र-पत्रिकाओं में छपने लगीं।

तसौव्वुफ़ और शायरी में एक अनजाना आपसी सम्बन्ध है। यह ज़रूरी नहीं कि हर सूफ़ी शायर हो या हर शायर सूफ़ी हो, लेकिन हर अच्छे शायर के यहाँ आध्यात्मिक और सूफ़ियाना अनुभूतियों की झलक होती है। मशहूर सूफ़ियों के मिजाज़ में शायरी के लिए आकर्षण और संवेदनशीलता ज़रूर होती है। सच यह है कि तसव्वुफ़ की बातें, इशारे और प्रतीक जो शायरी की आत्मा से सरसता और सिंगार पाते हैं, वे काव्य को सौंदर्य से भर देते हैं।

संत दर्शनसिंह जी के माहौल में आध्यात्मिकता के साथ-साथ शायरी की मादकता का सुरूर भी पाया जाता था। स्वयं संत कृपालसिंह जी महाराज भी शायर थे और परम संत सावनसिंह जी महाराज ने तो फ़ारसी की सूफ़ियाना शायरी की ओर विशेष रूप से अपने शिष्यों का ध्यान आकर्षित कराया था। इस आम रुझान के अलावा भी माहौल ऐसा था कि वे आप स्वयं भी यदि शायरी की ओर रुख न

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

### अंतरीक बल

दूसरों की बातों को ध्यान से और अपने पन से सुनो। ज उसकी बातें चुभ रही हैं, तुरंत मन में कहो आप शांत हो, शांत ह बिना बोलें मन में बोली जाने वाली भाषा सब सुनते हैं और फिर अनजान व्यक्ति पर आप की छाप छोड़ती है। पैर हिलाना, सि खुजलाना, हमेशा सहारा ले कर खड़े होना, ये ऐसी बिना बोली क भाषा है, जिस का दूसरे पर बुरा प्रभाव पड़ता है।

समय प्रबन्धन और विचार (२)

जैसे हमारे विचार होते हैं वैसे ही हम कपड़े पहनते हैं। इसलिए हमारे कपड़े भी दूसरे पर प्रभाव डालते हैं। पुलिस, डाक्टर, वकील अमीर, भिखारी आदि की पहचाना उसके कपड़ो से ही होती है। उम्र व अवसर के अनुसार वस्त्र हमारे व्यक्तित्व को निखारते हैं। बचपन में गहरे रंग के, जवानी में रंग बिरंगे और ढलती उम्र में हल्के रंग के कपड़े बड़े अच्छे लगते हैं। हमारी आदते भी विचारों से ही बनती हैं। हमारी आदतें चिंता, तनाव व खुशी को प्रकट करती हैं। काम टालने की आदत हमें बहुत नुकसान करती हैं। जब भी काम टालने का विचार मन में आये तुरंत मन में शिव बाबा या ईष्ट को देखें और ५ बार या ज्यादा बार कहें आप शांति के सागर हैं, शांति के सागर है। या ऐसे ही दूसरी स्नेही आत्माओं को भी मन से कहें आप शांत हैं। शांत है। या जैसे ही मन में काम टालने का विचार आए तुरंत कहें मैं यह काम करता हूं करता हूं या आज करूगा करूगा। ऐसा करने से हमारा मन शक्तिशाली बनता हैं और धीरे धीरे काम टालने की आदत बदलती जाएगी। जितना बड़ा ज्ञानी और समझदार व्यक्ति होता है। वह उतना ही नादान, लापरवाह और असावधान होता है। वह प्राकृति के नियमो का उलंघन करता है। इसलिए कष्ट उठाता हैं। यही कारण

है कि आज महान राजयोगी भी बीमार हैं। पशु पक्षी बीमार हो जाते हैं तो खाना छोड़ देते हैं। मनुष्य बीमार हो जाएं तो परहेज नहीं करता। पशु पक्षी अपना ही खाना खाते हैं और स्वस्थ रहते हैं। मनुष्य हर प्रकार का खाना खा जाता है। इस लिये बीमार रहता है। पशु-पक्षी जब उठते हैं तो अंगड़ाई आदि लेते हैं और दौड़ते हैं। मनुष्य ऐसा नहीं करता इसलिए बीमार रहता है। अगर हम स्वस्थ रहना चाहते हैं तो हमें प्राकृति अर्थात पांच तत्वों का, आसनों, रसों एवं भोजन का पूरा ज्ञान होना चाहिए। थोड़ा थोड़ा इन के बारे हर रोज पढ़ते रहें ।

समय प्रबन्धन और प्रशंसा

हर किसी को अपनी प्रशंसा सुनना और दूसरों द्वारा प्रोत्साहित करना अच्छा लगता हैं। मन ही मन दूसरों की यह इच्छा पूरी करते रहें। जो भी व्यक्ति जिसे हम देखें वह चाहे जानकार हो, चाहे अनजान, मन में उसे कहें, आप स्नेही हो, आप शांत हो, मैं आप को पसंद करता हूं। आप योग का अभ्यास कर रहे हैं या कुछ पढ़ रहे हैं या कुछ कार्य कर रहे हैं, उस समय हम कभी किसी एक तो कभी दूसरे व्यक्ति के बारे सोचने लगते हैं। जैसे ही कोई व्यक्ति मन में आए, मन में ही उसे कहो, आप स्नेही हैं, शांत हैं, आई लाईक यू। आप के यह विचार उस तक पहुंच रहे होते हैं। उसे अच्छा लगेगा। बदले में वह भी आप के प्रति अच्छा सोचेगा। उन लोगों में कोई विशेषता नहीं होगी फिर भी उन के प्रति ऐसे ही स्नेह और शांति के संकल्प करने हैं। घर में एक स्थान पर बैठ कर या चलते फिरते विश्व की सर्व आत्माओं प्रति यही शांति और प्रेम के संकल्प करने हैं। संसार बदलेगा क्योंकि यह संकल्प ईथर के माध्यम से संसार के सभी लोग सुन रहे होते हैं। ऐसे ही बोल द्वारा भी अच्छे शब्द ही बोलने हैं, क्योंकि बोल दूसरे पर अमिट छाप छोड़ते हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### मधुर संगीताचे महत्त्व

लावले असता, आईच्या व बाळाच्या दृष्टीने अत्यंत नाजूक अशी प्रसूतिअवस्था सुखरूप पार पडते. असा अनुभव आम्ही आमच्या हॉस्पिटलमधील रुग्णांच्या बाबतीत वारंवार घेत आहोत व संशोधनामध्ये देखील हे सिद्ध झाले आहे की, वारंवार ऐकलेल्या संगीतामुळे, प्रसूतीच्या वेळेस जर तेच संगीत ऐकले, तर बाळ व आई न घाबरता प्रसूतिअवस्थेला सामोरे जाते; म्हणून प्रसूती होत असताना प्रसूतिगृहात सौम्य आवाजात संगीत लावावे; म्हणून गर्भवती मातेने घरातील कामे करताना, स्वयंपाक करीत असताना सौम्य आवाजात नेहमी सुमधुर संगीत ऐकावे. सुमधुर संगीतामध्ये ईश्वरावरील प्रेमाचा, भक्तीचा विषय असणाऱ्या भजन गीतांचा देखील समावेश करावा.

**रघुपति राघव राजाराम पतितपावन सीताराम**
**जानकीजीवन रामनाम सुंदर माधव मेघश्याम।।१।।**
**पतितपावना रामा। जय जय पावना रामा।।२।।**

आज कलर डॉप्लर मशीनद्वारे बाळाच्या हालचालीत्यावर आपल्या संभाषणाचे परिणाम, संगीताचे परिणाम, तबल्याच्या बोलाचे परिणाम, माता-पित्यांच्या बोलण्याचा आनंदित हालचालींद्वारे दिलेला प्रतिसाद हे सर्व काही आपल्याला पाहता येते. पहिल्या महिन्यातील अगदी नाजूक गर्भाचे ठोके मोजता येतात. बाळाच्या प्रत्येक महिन्याची वाढ आपल्याला बघता येते. पचेंद्रिये विकसित झाली आहेत किंवा नाही तसेच त्यांचा वापर बाळ करायला लागले आहे किंवा नाही हे समजते. बाळाला दिसते, ऐकू येते, त्याला डोळे उघडझाप करता येतात, प्रखर प्रकाश असल्यास तो डोळे बाजूला करतो. कर्कश्श आवाजाने बाळ घाबरते हे आता या मशिनद्वारे सिद्ध करता येते.

अल्ट्रासाउंडच्या आधुनिक शास्त्रातील प्रगतीमुळे-स्कॅनर्सद्वारे अगदी पहिल्या महिन्याच्या गर्भापासून त्याच्या वाढीच्या हालचालीच्या नोंदी करणे शक्य झाले आहे. त्यामुळे सातव्या महिन्यापासून पंचेंद्रियांचा वापर बाळ करत असते. तसेच त्या गर्भाला दिसते, ऐकू येते. डोळ्यांची उघडझाप करणे प्रखर प्रकाशाच्या विरुध्द बाजूला डोळे वळविणे, मोठ्या आवाजाने दचकणे, दुःखी होणे तसेच गर्भ जन्मल्यानंतर जसा झोपतो उठतो तसाच शेवटच्या चार आठवड्यात झोपत-उठत असतो. गर्भाला आईचा आवाज आणि इतर आवाज यांच्यातील फरक समजत असतो. अमेरिकेतील सॅन फ्रेंन्सिस्को येथे केलेल्या प्रयोगात तर काही डॉक्टरांनी आईच्या पोटावर तोंड ठेवून दिलेल्या सुचनेनुसार गर्भाने हात पाय जवळ लांब केल्याचेही सिध्द केले आहे. संगिताच्या व मंत्रशास्त्राच्या वापराने गर्भवतीने स्वतःला मानसिकदृष्ट्या सतत तंटा ठेवले पाहिजे. एका वैद्यकीय अहवलात ५०० महिलांपैकी ३७ टक्के गर्भवतींना नैराश्य आलेल्या जाणवले तसेच अशा स्त्रियांमधून ३० ते ७५ टक्के स्त्रियांचे गर्भपात नैराश्यामुळे झालेले आढळले तणावग्रस्त परिस्थिती मुळे गर्भाला रसरक्त पुरवठा करणारी गर्भनाळ व अपरा (Placenta) मधील रक्तवाहिन्यांचे आकुंचन होते व परिणाम स्वरुप कृश संतती किंवा गर्भपात, रक्तस्त्राव होण्याची शक्यता वाढते. तसेच अत्यंत तणावग्रस्त परिस्थितीत जन्मलेली मुले पुढे परिस्थितीला समोरे जाण्यास कचणारी, भित्री निपजतात अशांच्या पुढील व्यसनाधीनतेचे किंवा मानसिक आजारपणाचे कारण ही परिस्थितीच असू शकते. ॲन्थनी कॅप्सर या शास्त्रज्ञाच्या संशोधनात त्याने असे सांगितले आहे. बाहेरचे सर्व आवाज, ध्वनीलहरीमार्फत, बाळापर्यंत पोहोचतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



अहिल्यानगर इंडियन डेंटल शाखेला राज्यात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार नुकताच नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय डेंटल परिषदेमध्ये नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्या हस्ते देण्यात आला.

# अहिल्यानगरच्या इंडियन डेंटल शाखेला राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार

नगर – अहिल्यानगर इंडियन डेंटल शाखेने राज्यात चांगली कामगिरी करत प्रथम क्रमांकाचा पुरस्कार नुकताच नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय डेंटल परिषदेमध्ये देण्यात आला. डॉ. वसंत कोटक स्मृती चषकाने गौरव करण्यात आला. यावेळी नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी आहिल्यानगर शाखेच्या अध्यक्षा डॉ. मनीषा कुलकर्णी, सचिव डॉ. नेहा जाजू, उपाध्यक्षा डॉ. पायल धूत, डॉ. शिल्पा इनमुलवार (WDC HEAD), डॉ. सोनम मुथीयान (ECTS HEAD) आदी सह डेंटल चे राज्यअध्यक्ष डॉ. विष्णुदास भंडारी, सचिव डॉ. विकास पाटील, डॉ. राजेश गोंधळेकर आदींसह राज्यभरातून डेंटल परिषदेसाठी आलेले डॉक्टर सहभागी झाले होते.

यावेळी नांदेड चे जिल्हाधिकारी अभिजित राऊत म्हणाले कि आहिल्यानगरच्या इंडियन डेंटल शाखा खरोखरच पुरस्कारास प्राप्त ठरल्या आहेत. शाखेच्या सर्व पदाधिकारी या महिला असल्याने त्यांनी आपल्या कार्यांने संपूर्ण राज्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळाला तो खरोखरच कतुकास पात्र आहे. सध्या दंत वैद्यकीय क्षेत्रात सातत्याने वेगवेगळे बदल होताना दिसत आहे. येथील राज्यस्तरीय सेमिनारच्या माध्यमातून निश्चितच सर्व दंत वैद्यकीय यांना खूप काही शिकण्यासाठी मिळेल असे ते म्हणाले.

यावेळी आहिल्यानगर शाखेच्या अध्यक्षा डॉ. मनिषा कुलकर्णी म्हणाल्या कि आम्ही सर्व पदाधिकारी यांनी शहरच नव्हे तर जिल्हात ठिकठिकाणी जाऊन डेंटलचे विविध शिबीरे घेतले, रुग्णावर उपचार केले, विविध स्वयंसेवी संस्थांना मदत केली त्यामुळेच आम्ही प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळवू शकलो हे यश आमच्या महिला पदाधिकारी यांचे असल्याचे त्यांनी सांगितले.

सचिव डॉ. नेहा जाजू म्हणाल्या कि आमच्या डेंटल शाखेने आजपर्यंत अनेक शालेय विद्यार्थी यांची दंत तपासणी करून त्यांचेवर उपचार केले तसेच विविध आरोग्य शिबिरे, मतदान जनजागृती अभियान, रक्तदान, वृक्षारोपण आदी प्रमुख उपक्रम राबविले तसेच आमच्या शाखेने पुणे (चाकण) येथे राज्यस्तरीय डेंटल परिषदेचे सुद्धा आयोजन केले होते.

# विजेता करंडक स्पर्धेने नगरच्या क्रिकेटचा दर्जा व लौकिक वाढवला

## नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन



विजेता करंडक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया.

नगर – नगरच्या क्रिकेट मध्ये स्व.संजय बोरा यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या स्मरणार्थ होणाऱ्या या स्पर्धेच्या उत्कृष्ट आयोजनामुळे नगरच्या क्रिकेटचा दर्जा व लौकिक वाढले आहे. या स्पर्धेमुळे शहरातील युवक एकवटले आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त ही स्पर्धा होत असल्याने स्पर्धेच्या माध्यमातून नगरचे क्रिकेट वाढत असल्याने अनेक खेळाडू घडत आहेत, असे प्रतिपादन जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष व उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

शहरात विजेता क्रिकेट क्लबच्या वतीने गेल्या सहा वर्षांपासून विजेता करंडक क्रिकेट सोर्धेचे आयोजन वाडीयापार्क मैदानावर केले जात आहे. जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे तत्कालीन सेक्रेटरी स्व.संजय बोरा यांच्या स्मरणार्थ होणाऱ्या या स्पर्धेस आयोजकांनी आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे आयपीएल सारख्या क्रिकेट स्पर्धेचे स्वरूप दिले आहे. डे अ‍ॅण्ड नाईट पद्धतीने होणाऱ्या या स्पर्धेसाठी वाडीयापार्क मैदान फ्लड लाईट्सने उजळले आहे. डीआरएस रिव्ह्यू, रिप्ले, एचडी युट्युब लाइव्ह, स्ट्म्प माईक असे अत्याधुनिक तंत्रज्ञान येथे वापरण्यात येत आहे. आयपीएलच्या धर्तीवर संघांची नावे असून सहभागी संघांच्या खेळाडूंची आकर्षक पोस्टर्सही मैदानात लावण्यात आले आहेत.

विजेता करंडक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने व हवेत फुगे सोडून झाले. यावेळी जी.प. माजी सदस्य सचिन जगताप, श्रीमती मधु बोरा, अशोक बोरा, माजी रणजीपटू अनुपम संकलेचा, अभिजीत गांधी, सचिन मुनोत, प्रशांत बोकारिया, अभिनंदन भन्साळी, वरुण चोपडा, परेश गांधी, अतुल शिंगवी, राजेंद्र चोपडा, आदित्य इंदाणी, अमित लड्डा, आनंद चंगेडीया, कुणाल डुंगरवाल आनंद गांधी, सुमित लोढा, आनंद गुगळे, निखिल लुणीया, रोनक मुनोत, विशाल शेटीया, पवन झंवर, विनोद कटारिया, रोनक शेटिया व सुवेंद्र गांधी उपस्थित होते.

सचिन जगताप म्हणाले, जगताप कुटुंबियांचे स्नेही स्व.संजय बोरा यांनी तत्कालीन काळात दिलेल्या योगदानामुळे नगरमधील क्रिकेट वाढले आहे. विजेता करंडक स्पर्धेमुळे शहरात चांगले क्रिकेटमय वातावरण निर्माण होत आहे. असे सांगून आयोजकांना उत्कृष्ट नियोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकात विजेता करंडक क्रिकेट स्पर्धेची माहिती देताना विनीत बोरा म्हणाले, स्व.संजय बोरांनी त्याकाळी नगरमध्ये अनेक क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले होते. त्यांचा वारसा पुढे चालवण्यासाठी विजेता क्लबच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. आंतरराष्ट्रीय व टी २० आयपीएल क्रिकेट स्पर्धेतील नियम या स्पर्धेत आम्ही लागू केले आहेत. यासाठी सर्वप्रकारचे अत्याधुनिक तंत्रज्ञान येथे आहे. या स्पर्धे साठी शहरातील अनेक दानशुरांनी मदत केली असल्याने स्पर्धेचे भव्य आयोजन झाले आहे. त्या सर्वांचे विजेता क्लब ऋणी आहे. अत्यंत चुरशीचे सामने येथे होत असल्याने नागरिकांनी आयपीएल मॅच पाहण्यासाठी वाडीयापार्क मैदानावर यावे, असे आवाहन केले.

सूत्रसंचालन हर्ष बोरा यांनी केले. अमोल शिंगी यांनी आभार मानले.


# नुरील भोसले यांची कलाकृती चंद्रावरती होणार संग्रहित

## जगभरातून आलेल्या कलाकृतीमधून झाली निवड



नगर – न्यूयॉर्क येथील आर्ट रिन्यूअल सेंटर हे जगभरातील वास्तववादी कलाकृतीचे स्पर्धा प्रदर्शन दरवर्षी भरवते. यामध्ये राहुरी येथील कलाकार नुरील भोसले यांची कलाकृती अंतिम यादीत आली असून, चंद्रावरतीही संग्रहित करण्यात येणार आहे. व्यक्ती व पशु याचे भावनिक नाते दाखविणारे चित्र त्यांनी रेखांकनातील अतिशय अवघड समजल्या जाणाऱ्या स्टीपलिंग प्रकारात म्हणजे बिंदू देऊन चित्र रेखाटून ४४ बाय ३५ इंच आकारात दर्जेदारपणे पूर्ण केली आहे. यासाठी त्यांना तब्बल चार वर्षे लागली.

दरवर्षी न्यूयॉर्क येथील आर्ट रिन्यूअल सेंटर या स्पर्धेत विविध विभागात वास्तववादी कला सादर करण्यासाठी जगभरातील मातब्बर कलाकार प्रयत्नांची पराकाष्टा करत असतात. राहुरी (जि. अहिल्यानगर) येथील नुरील प्रभात भोसले यांच्या रेखांकनाला सलग तिसऱ्यांदा हा बहुमान मिळाला आहे. त्यांच्या कलाकृतीची निवड अंतिम यादीत झाली असून, द कॅम्पॅनीयन (सोबती) असे त्यांच्या चित्राचे नाव आहे.



राहुरी येथील मखना (मका) या गोपाळ व्यक्तीची व त्याच्या म्हशीचे (रबडी) चित्र स्टीपलिंग माध्यमात त्यांनी साकारले आहे. रेखांकनातील अतिशय अवघड समजला जाणारा स्टीपलिंग प्रकार म्हणजे विशिष्ट पेनाने कागदावरती जवळजवळ बिंदू देऊन चित्र रेखाटने. चार वर्षाच्या प्रदिर्घ कष्टातून त्यांनी चित्र साकारले आहे.

१७ व्या या वर्षीच्या स्पर्धेमध्ये जगभरातून सुमारे ८७ देशांच्या ५ हजार कलाकृतींनी अर्ज केला होता. यातील २४ टक्के म्हणजेच १२२६ कलाकृतींची निवड करण्यात आली असून, यातील निवडक कलाकृतींचे प्रदर्शन न्यूयॉर्क शहरांमध्ये भरविण्यात येणार आहे. मानवाने निर्माण केलेल्या अजरामर कलाकृती चंद्रावरही जतन केल्या जाव्यात, या प्रकल्पासाठी लुनर (चंद्र) कोडेक्स या प्रणालीने एक विशेष तंत्रज्ञान भौतिक विज्ञानी कला संग्रहकर्ता सॅम्युअल पेराल्टा (कॅनडा) यांच्या अध्यक्षतेखाली विकसित केला आहे. ज्यात जगभरातील सुमारे १५७ देशातील ३० हजार अतुलनीय कलाकृती चंद्रावरती डिजिटल स्वरूपात पाठवून संग्रहित ठेवण्यात येणार आहेत. यामध्ये चित्र, संगीत, फिल्म, कविता, लिखाण यांचा समावेश आहे. नुरिल भोसले यांच्या द कॅम्पॅनीयन (सोबती) या चित्राची यामध्ये निवड झाली आहे.



## ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स इंग्लंडकडून ग्लोबल आयकॉन २०२४ ने डॉ. दीपक हरके सन्मानित

मुगलखोड (कर्नाटक) बेळगावी जिल्ह्यातील मुगलखोड येथे जिदगा मुगलखोड मठाचे पीठाधिपती शिवयोगी डॉ. मुरुघा राजेंद्र महास्वामीजी यांच्या हस्ते प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांना भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी ग्लोबल बुक एक्सलेन्स इंग्लंड कडून सर्टिफिकेट, मेडल व ट्रॉफी देऊन ग्लोबल आयकॉन २०२४ ने सन्मानित करण्यात आले. यावेळी ग्लोबल बुक एक्सलेन्स इंग्लंडचे अध्यक्ष मनिष आगरवाल उपस्थित होते.



वांबोरी हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अंकुर रिसॉर्ट ढवळपुरी येथे पार पडला.

# वांबोरी हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

## मैत्रीपूर्ण संबंधाला मिळाला उजाळा

वांबोरी – वांबोरी इंग्लिश स्कूल (आताचे महेश मुनोत माध्यमिक विद्यालय) येथील ११वीचे १९७३च्या बॅचच्या शाळू सोबत्यांचा स्नेहमेळावा नुकताच 'अंकुर रिसॉर्ट' ढवळपुरी येथे पार पडला. वयाची सत्तरावी जवळ आलेल्या ४३ मित्र–मैत्रिणींनी एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा देत हा मेळावा आनंदात पार पडला. परिचय प्रस्तावनेत अनेकांची नव्याने परत ओळख झाली. प्रत्येकाने गेल्या ५१ वर्षांतील आपल्या आयुष्याचा व कर्तबगारीचा आढावा मांडला. यात नामांकित डॉक्टर, प्राध्यापक, व्यावसायिक, प्रगतीशील शेतकरी, लष्करी, बँक अधिकारी यांचा समावेश होता. रात्री शेकोटी व थंडीचा आनंद घेत गप्पा गोष्टींना सुरुवातीला डॉ. उत्तम ताम्हाणे, डॉ. भानुदास मोरे, अ‍ॅड. उषा भटेवरा यांनी या वयातील जीवनशैली कशी असावी याचे सुंदर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात अगदी लहान मुल होऊन सर्वांनी रिसॉर्टवरील बोटींग, ट्रेकिंग व इतर अन्य सेवांचा मनमुराद आनंद घेतला. पुढील वर्षी नक्की परत भेटावयाचे असे, एकमेकांना वचन देऊन आनंदी मनाने सर्वांनी निरोप घेतला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रमोद बिहाणी, भानुदास मोरे, विजय चोथे, गोरक्ष नवले यांनी विशेष पुढाकार घेतला. मेळाव्यास पुणे, नाशिक, ठाणे, वांबोरी, उंबरे, राहुरी येथील जवळपास ४३ मित्र–मैत्रिणी उपस्थित होते.

# गंभीर गुन्ह्यातील आरोपी दोषमुक्त

## जिल्हा न्यायालयाचा निकाल

नगर – येथील कोतवाली पोलिस ठाण्यात राजेंद्र अशोक साबळे व इतर व्यक्ती विरुध्द गु.र.नं.७९२/२०२१ नुसार भा.द.वि.क.४२०, २८५ जिवनावश्यक वस्तू कायदा कलम, स्फोटक कायदा कलम, पेटोलियम कायदा कलम अशी गंभीर कलम लावून गंभीर गुन्ह्यात आरोपी केले होते. या कलमा नुसार केडगाव उपनगर येथे तथाकथित बेकायदा बायोडिझेल सदृष्य इंधन विक्री, सरकारची फसवणूक करत असल्या बाबतचा तथाकथित गंभीर गुन्हा दाखल करुन कोतवाली पोलीसांनी सदर गुन्ह्याचा सखोल समातंर तपास करुन जिल्हा न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. तथापि सदर आरोपी विरूध्द सदर दोषारोप पत्रात सबळ व ठोस पुरावा नाही. सदर गुन्हाशी राजेंद्र साबळे यांचा संबंध नाही यासाठी आरोपीतर्फे अ‍ॅड. सचिनदेवा पाठक यांनी डिस्चार्ज अप्लिकेशन अर्ज न्यायालयात दाखल केले होते. या अर्जावर अ‍ॅड. पाठक यांनी पूर्णपणे युक्तीवाद करून या आरोपी विरूध्द कुठलाही ठोस पुरावा नाही. व सदर गुन्ह्याशी या आरोपीचा संबंध नाही. तथाकथित बायोडिझेल सदृष्य इंधन सदर आरोपी विक्री करत होता. किंवा सदर गुन्ह्यात इतर आरोपीना मदत करत होता. असा आरोप ठेवण्यात आलेला होता. परंतु तसा एकही पुरावा उपलब्ध नव्हता. राजेंद्र साबळे हे उपनगरातील केडगांव नगर पुणे महामार्गावरील केडगाव येथील हॉटेल नील हे चालवित असून सदर गुन्ह्यात साबळे यांचा सहभाग नाही. पोलीसांनी दोषारोप पत्र दाखल केले होते.

तथापी सर्व दोषारोप पत्रात साबळे यांच्या बाबतीत तीळमात्र ठोस पुरावा उपलब्ध नव्हता या सर्व गोष्टी न्यायालयाच्या निर्देशनांस आणून दिल्या. विनाकारण सदर गुन्ह्यात आरोपीस अडकविण्यात आले आहे. हे अ‍ॅड. पाठक यांनी न्यायालयाच्या नजरेस आणून दिले. या आधारावर व न्यायालयाच्या समोर आलेला सर्व पुरावा पाहून जिल्हा न्यायालयाने आरोपी यांस गुन्ह्यातून वगळले. तसा आदेश पारीत करून सदरचे डिस्चार्ज अप्लिकेशन अर्ज मान्य केलाव आरोपीला सदर गुन्ह्यातील दोषारोप पत्रातून दोष मुक्त केले.

# 'दप्तर मुक्त दिनी' झाला कथाकथन कार्यक्रम




बाळासाहेब देशमुख विद्यार्थ्यांसमोर कथाकथन सादर करताना.

नगर – श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक विभाग सांगळे गल्ली शाळेचे मुख्याध्यापक अजय महाजन व शाळा समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून दप्तर मुक्त शनिवार या उपक्रमांतर्गत कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचा 'कथाकथन' कार्यक्रम शाळेत झाला.

अध्यक्ष स्थानावरून बोलताना मुख्याध्यापक अजय महाजन म्हणाले विद्यार्थ्यांवरती अभ्यास, लेखन, यांचा भार सदोदित असतो. वेळच्यावेळी तो पूर्ण करावा लागतो. विद्यार्थ्यांमधील कलागुण, छंद, आवड, कल, समजण्यात साठी 'दप्तर मुक्त शनिवार' या उपक्रमाचा फायदा झाला. यानिमित्ताने वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांचे व्याख्यान, कथाकथन, प्रात्यक्षिक, ठेवले जाते. 'कथाकथन' सारख्या कार्यक्रमातून संस्कार, उद्बोधन होते. विद्यार्थी भारावलेले दिसून येतात. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लेखकाशी हितगुज करता येतो.

बाळासाहेब देशमुख यांनी याप्रसंगी 'अबोली' व 'माणुसकीचा धर्म' या कथा सादर केल्या. अभिनय, देहबोली सह सादर केलेल्या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक वृंद, मंत्रमुग्ध होऊन गेले. अबोली कथेतील छोटी चिमुरडी आपणास प्रश्न विचारते. कोडी घालते. मुलाखत घेते. प्रश्नांचा भडीमार करून सोडते. तिच्या शंकांना, प्रश्नांना उत्तरे देताना आपली त्रेधा तिरपीट उडते. या कथेतून देशमुखांनी लहान मुलांचे भाव विश्व उलगडून दाखविले. माणुसकीचा धर्म या कथेद्वारे छोट्या गावातील सखुबाई माणुसकीचे दर्शन देत, समाजसेवा करत राहते. शाळेतील मुलांना पाणी, ताक देणे. मजुरांच्या बाळंतीन होणाऱ्या मुलींना लाडू देणे. गावात बदलून आलेल्या शिक्षकाला भाडे न घेता आपली रूम रहावयास देणे. अशी विधायक कामे ती करते. सावित्रीबाई फुले, बहिणाबाई चौधरी यांच्या कार्याचा वारसा तिच्यामध्ये दिसून येतो, हे देशमुख यांनी कथेद्वारे दाखवून दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश मेढे, शंकर निंबाळकर, संदीप गायकवाड, श्रीमती शितल जर्हाट, सौ. सविता येवले, सौ. सुनीता पांडव यांनी परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



जिल्हा एडस् प्रतिबंध व नियंत्रण विभागामार्फत शहरात एचआयव्ही प्रतिबंध व नियंत्रण जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

# एचआयव्ही प्रतिबंध व नियंत्रण जनजागृती रॅली

नगर – जागतिक एडस् दिनानिमित्त समाजात व्यापक प्रमाणावर जनजागृती होण्याकरिता जिल्हा एडस् प्रतिबंध व नियंत्रण विभागामार्फत शहरात एचआयव्ही प्रतिबंध व नियंत्रण जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रॅलीचे उद्घाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एन.एस. चव्हाण व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांच्या हस्ते करण्यात आले. रॅलीस जिल्हा रुग्णालयातून प्रारंभ होऊन अप्पू हत्ती चौक– सर्जेपुरा– बागडपट्टी –सिद्धी बाग –न्यू आर्ट्स कॉलेज अप्पू हत्ती चौक मार्गे– जिल्हा रुग्णालयात समारोप करण्यात आला.

या प्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वैजनाथ गुरवले, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक (बाहय संपर्क) डॉ. शिवशंकर वलांडे, रुग्णालय व्यवस्थापक डॉ. मनोज घुगे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिवाजी जाधव, समन्वयक अधिकारी डॉ. निलेश गायकवाड, श्रीमती छाया जाधव, अजय विष्टे, प्रशांत येनडे आदी उपस्थित होते.

तरुणांनी वयाच्या या महत्त्वाच्या टप्प्यात एचआयव्हीबाबत योग्य ज्ञान प्राप्त करून कोणत्याही चुकीच्या निर्णयांना टाळावे. एचआयव्ही एडस् प्रतिबंध व निमंत्रण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे सध्या आपण अधिक सुरक्षित जीवन जगत आहोत, असे डॉ.चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

डॉ. नागरगोजे म्हणाले, समाजात एचआयव्ही एडस् संदर्भात जनजागृती करवण्यासाठी महाविद्यालयीन युवक आणि समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. यामुळे पुढील पिढीला या आजारापासून सुरक्षित ठेवता येईल.

रॅलीत ईव्हॅन्जलीन बुच हॉस्पीटल, आनंदऋषी हॉस्पीटल, न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालय, नर्सिंग कॉलेज, जिल्हा रुग्णालय, स्नेहालय टिआय संस्था, श्री अमृतवाहिनी ग्रामीण विकास मंडळ अमृतदिप प्रकल्प, प्रयत्न नर्सिंग कॉलेज, ताराबाई नर्सिंग कॉलेज, ए.ई सोसायटी अध्यापक विद्यालय, पेमराज सारडा कॉलेज, सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालय, रोटरी क्लब मिडटाऊन, दादासाहेब रुपवते कनिष्ठ महाविद्यालय, डॉ. विखे पाटील नर्सिंग महाविद्यालय, सेंट मोनिका अध्यापिका महाविद्यालय, श्री छत्रपती शिवाजी महाराज इंजिनियरिंग कॉलेज, अध्यापक विद्यालय दिल्ली गेट, एनएडिपी संस्था विहान प्रकल्प व विश्व भारती अभियांत्रिकी महाविद्यालय आदी संस्थेमधील डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना एचआयव्ही एडस् प्रतिबंध व नियंत्रणाची शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर पथनाट्याचे यावेळी सादरीकरण केले.

प्रास्ताविकात शिवाजी जाधव यांनी जिल्ह्यातील एडस् प्रतिबंध व नियंत्रण विभागाद्वारे झालेल्या कामांची आणि उपलब्ध सेवांची माहिती दिली.

# नाना महाराज मंदिरात ९ ते १६ डिसेंबर दरम्यान '२३२ व्या अखंड हरिनाम सप्ताहा'चे आयोजन

## कस्तुरे, चवंडके, देशमुख, तुंगार, जाधव व रानडे यांची सुश्राव्य प्रवचने; भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन



नगर – येथील दिल्लीगेट जवळील श्री नाना महाराज मंदिरात सालाबादप्रमाणे आयोजित करण्यात आलेला २३२ वा अखंड हरिनाम सप्ताह ९ ते १६ डिसेंबर २०२४ दरम्यान होणार असून जय्यत तयारी करण्यात आली आहे, अशी माहिती भगवान देशमुख आणि सी.ए. संजय देशमुख यांनी दिली.

ते म्हणाले, आमच्या घराण्यातील साक्षात्कारी तत्ववेत्ते संत श्री नाना महाराज यांनी शके १७८४ मध्ये येथे संजीवन समाधी घेतली. त्यांचे पुत्र श्री नरहरीबुवा यांनी सुबक समाधी मंदिर उभारले. श्री नाना महाराज हे निस्सीम विठ्ठल भक्त होते. त्यांनी सुरू केलेला अखंड हरिनाम सप्ताह यावर्षी २३२ वे वर्ष पूर्ण करतो आहे. शहरात इतकी वर्षे विनाखंड चाललेला हा एकमेव हरिनाम सप्ताह असून तो देशमुख परिवार श्रध्देने अन् निष्ठेने चालवत आहे, हे विशेष होय. एक परिवार कुटूंबातील एका विचाराने दरवर्षी हरिनाम सप्ताहाची पिढीजात परंपरा श्रध्देने जतन करत आहे, हे अत्यंत दुर्मिळ आणि कौतुकास्पदच आहे. खाजगी मालकीच्या या मंदिरात नाना महाराजांचे वंशज गुण्यागोविंदाने नांदत आहेत. श्री नाना महाराजांनी लिहिलेले ३०० स्फुट अभंग, सौरी इ.रचना आणि श्रीविवेक सुदर्शन हा ३०० अध्यायांचा ८५०० ओव्यांचा हस्तलिखित ग्रंथ मंदिरात आजही सुस्थितीत उपलब्ध आहे.

नामसप्ताहाचा शुभारंभ ९ डिसेंबर ला सकाळी ९ वाजता भगवान देशमुख यांच्या हस्ते विधीवत पूजनाने होईल. ९ ते १५ डिसेंबर दरम्यान दररोज सकाळी ८ ते ११ या वेळेत श्रीगुरूचरित्र पारायण होईल. दुपारी ४ ते ६ या वेळेत हरि ओम भजनी मंडळ, महालक्ष्मी भजनी मंडळ, अंबिका भजनी मंडळ, स्वरमंदिर भजनी मंडळ, सप्तसूर भजनी मंडळ आणि स्वरानंद भजनी मंडळ या महिला भजनी मंडळांच्या भजनांचे कार्यक्रम अनुक्रमे पार पडतील. ११ डिसेंबरला सकाळी ११ ते दुपारी १ दरम्यान मुक्ताई भजनी मंडळाचा सामुहिक गीता वाचनाचा कार्यक्रम आणि दुपारी ४ ते ६ दरम्यान राधे राधे भजनी मंडळाचे भजन होईल.

सप्ताह कालावधीत सायंकाळी ६ ते ७ या वेळेत प्रवचन व हरिपाठ सोहळा पार पडेल. प्रवचनकर्ते व त्यांचे विषय असे – ९ डिसेंबरला हभप महेश कस्तुरे. विषय–संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली जीवन चरित्र, १० डिसेंबरला नाथ संप्रदायाचे संशोधक मिलिंद चवंडके. विषय–नाथांची दत्तभक्ती. ११ व १२ डिसेंबरला हभप निळकंठ देशमुख. विषय– श्रीमद् भगवद् गीता. १३ डिसेंबरला सौ.वैजयंती तुंगार. विषय– मनाचे श्लोक व त्यातील मनोवेध सारांश. १४ डिसेंबरला हभप संजय जाधव. विषय–ज्ञानेश्वरी. १५ डिसेंबरला सौ.स्वाती रानडे. विषय–श्रीरामरक्षेतील राम.

सप्ताहामध्ये रात्री १० ते १२ या वेळेत अनुक्रमे श्री संत रोहिदास भजनी मंडळ, श्रीशिवगोरक्ष हनुमान चालिसा सत्संग मंडळ, नागेश्वर भजनी मंडळ, नेप्ती येथील श्री गोरक्षनाथ भजनी मंडळ आणि चौंडेश्वरी भजनी मंडळ या पुरूषांच्या भजनी मंडळांची भावमधुर भजने होतील. १३ डिसेंबर ला रात्री १० ते १२ यावेळेत हभप राधेशाम कुलकर्णी हे श्रीदत्त जन्माचे किर्तन करतील. १६ डिसेंबर ला दुपारी १२ ते ४ यावेळेत महाप्रसाद कार्यक्रम होऊन या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात येईल.

भाविकांनी या सप्ताहातील सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन देशमुख परिवारातर्फे करण्यात आले आहे.



रस्त्यावर थंडीत कुडकुडणाऱ्यांना धर्म प्रतिष्ठानतर्फे ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

# रस्त्यावर थंडीत कुडकुडणाऱ्यांना ब्लँकेटचे वाटप

नगर – थंडीनिमित्त शहरातील तापमानाचा पारा खालवत असताना मानवता हाच एक धर्म प्रतिष्ठानच्या वतीने शहरात रस्त्याच्या कडेला, बसस्थानक परिसर व रेल्वे स्टेशन परिसरात रस्त्यावर झोपलेल्या गरजूंना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. वाढती कडाक्याची थंडी पाहता अंगात हुडहुडी भरत असताना, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी रोहन शेलार, नजीम कुरेशी, विकी पवार, ॲड. नरेंद्र भिंगारदिवे, डॉ. रोबीन तडके, क्षीरसागर सर आदी उपस्थित होते.

थंडीत उघड्यावर जीवन जगणाऱ्या गरजू, निराधारांना थंडीत अचानकपणे ऊबदार ब्लँकेटची भेट मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण झाले होते. थंडीत कुडकुडणाऱ्यांना ब्लँकेट आधार देण्यात आला.

अल्ताफ सय्यद म्हणाले की, मानवता हाच एक धर्म प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम सातत्याने सुरु आहे.

सामाजिक बांधिलकी जपून गरजूंना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले असून, वंचितांना मायेची ऊब देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## ओकिनावा नॅशनल कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत संगमनेरच्या अद्विता हासेचे यश



नगर – २७ व्या ओकिनावा नॅशनल कराटे चॅम्पियनशिपमध्ये संगमनेर येथील कुमारी अद्विता आनंद हासे हिने दैदिप्यमान यश संपादन केले आहे. पुणे येथील श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज स्पोर्टस् कॉम्प्लेक्स बालेवाडी येथे नुकतीच ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेतील काता प्रकारामध्ये तिने रौप्य पदक तर स्पायरींग या क्रिडा प्रकारामध्ये कांस्यपदक पटकाविले.

संगमनेर येथील कराटे अकॅडमीचे संचालक दत्ता भांदुर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील शंभरहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. द्वितीय क्रमांकाचे सर्वाधिक पदकं मिळवून या स्पर्धेत टीम संगमनेरने राष्ट्रीय उपविजेतेपद मिळविले. अद्विता हासे ही किसन भाऊ हासे यांची नात आहे.

# गॅस महासुरक्षा जागरूकता शिबिर व पाककला स्पर्धेला प्रतिसाद



भारत गॅसच्या वतीने आयोजित एलपीजी गॅस सिलेंडर महासुरक्षा जागरूकता शिबिरानिमित्त घेण्यात आलेल्या पाककला स्पर्धेतील विजेत्या महिलांना पारितोषिके देताना परिक्षक सुरेखा मणियार. समवेत आयोजक राजकुमार मिश्रा, अजय पिसुटे, विवेक मुनोत, प्रिया मुनोत, मार्लिन एलिशा आदी

नगर – भारत गॅस कंपनी व रोटरी क्लब मिडटाऊनच्या वतीने शहरातील नागरिकांसाठी एलपीजी गॅस सिलेंडर वापरण्याबाबत महा सुरक्षा जागरूकता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भारत पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या वतीने आयोजित या शिबिरा निमित्त महिलांसाठी पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेला प्रतिसाद मिळाला. कंपनीच्या शहरातील अजय गॅस एजन्सी व आनंद गॅस एजन्सीच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जास्तीत जास्त घरोघरी जाऊन एलपीजी गॅस वापरण्याबाबत जागरूकता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले.

शिबिरात राजकुमार मिश्रा यांनी उपस्थितांना सुरक्षितपणे सिलेंडर वापरण्याबाबत माहिती देताना सांगितले, प्रत्येक नागरिकांनी सिलेंडर घेताना टाकीचे सील तपासून गॅस लिक होत नसल्याची खात्री करावी. तसेच टाकी आणून देणाऱ्या कंपनीच्या मनुष्या कडे असलेल्या डिव्हास द्वाराही टाकी तपासून घ्यावी. तसेच वर्षातून एकदा शेगडीची सर्व्हीसंग करावी, असे सांगून सुरक्षिततेच्या विवीध उपाययोजनांची प्रात्यक्षिकासह माहिती दिली.

प्रास्ताविकात अजय पिसुटे म्हणाले, भारत पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या वतीने सर्व नागरिकांना सुरक्षितता देण्यासाठी तसेच गॅस वापरण्याबाबत जागतिकता व सुरक्षितता वाढवण्यासाठी जनजागृती शिबिराच्या माध्यमातून देशभर मोहीम सुरू करण्यात आली आहे. यातून प्रत्येक घर सुरक्षित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. नगरमध्ये या शिबिराला नागरिकांनी प्रतिसाद दिला आहे.

सूत्रसंचालन शिवानी शिंगवी यांनी केले. रोटरी क्लब मिडटाऊनच्या सेक्रेटरी मार्लिन एलिशा यांनी आभार मानले. यावेळी आनंद गॅस एजन्सीचे विवेक मुनोत, प्रिया मुनोत, विजया फटांगरे, किरण वारुळे आदी उपस्थित होते.

यावेळी महिलांसाठी घेण्यात आलेल्या पाककला स्पर्धेलाही प्रतिसाद मिळाला. स्पर्धेतील विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. स्पर्धेचे परिक्षण सुरेखा मणियार यांनी केले.

पाककला स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे – प्रथम हर्षदा आहेर, द्वितीय सोनाली शिंदे, तृतीय मयुरी पडोळे, उत्तेजनार्थ आरती वारुळे व रेणुका कस्तुरे.

# इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी साठी स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीकडून अर्थसहाय्य



इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी साठी स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीकडून अर्थसहाय्य देण्यात आले.

भिंगार – गेली २८ वर्षे विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवा विषयक कार्य करीत असलेल्या स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीने आतापर्यंत भिंगार मधील इयत्ता १० वी व १२वीच्या शाळांत विद्यार्थ्यांना परीक्षा फी साठी १ लाख ५८ हजार ५६० रुपयांचे अर्थसहाय्य केले आहे, अशी माहिती प्रबोधिनीचे खजिनदार व शैक्षणिक प्रकल्प प्रमुख रितेश फिरोदिया यांनी दिली.

२५ वर्षे स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला,२३ रक्तदान शिबिर, १८ वर्षे गरजू शालेय विद्यार्थ्यांना गणवेश व बोर्ड परीक्षा फी साठी आर्थिक मदत इत्यादी उपक्रम राबवित आहे.

प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही फेब्रुवारी २०२५ मध्ये होणाऱ्या १२वी (HSC) बोर्ड परीक्षा व मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या १०वी (SSC) बोर्ड परीक्षा फी साठी शालेय विद्यार्थी सहाय्य योजने अंतर्गत ४५ विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षा फी चे वाटप करण्यात आले.

यामध्ये बट माया देवी गुरुदिताशाहा हायस्कूल मधील १२वीच्या ५ विद्यार्थ्यांना परीक्षा फी प्रत्येकी ५५०रु प्रमाणे २हजार ७५०रु व १०वी मधील १०विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षा फी प्रत्येकी ५४० प्रमाणे १० हजार ४०० रु दिले आहेत. तर कॅन्टोन्मेंट बोर्ड नूतन माध्यमिक विद्यालयातील पंधरा विद्यार्थ्यांना८ हजार १०० रुपये अशी एकूण १८ हजार ५०० रुपयेची मदत प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रमोद मुळे यांच्या हस्ते व ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विठ्ठलराव लोखंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळेकडे समारंभपूर्वक प्रदान करण्यात आली. याप्रसंगी कॅन्टोन्मेंट शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी मार्गदर्शन करून संस्थेने अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना गणवेश व बोर्ड परीक्षा फी साठी सहकार्य केल्याबद्दल आभार व्यक्त केले. शिक्षिका सौ. संध्या पाटकुलकर यांनी स्वागत करुन प्रास्ताविक केले. शिक्षक महेश भगत यांनी मनोगत व्यक्त केले.

आजवर प्रबोधिनीने गणवेष व शैक्षणिक साहित्यासाठी १ लाख ८३ हजार २१० रु. आणि इयत्ता १०वी व १२ वी बोर्ड परीक्षा फी साठी १लाख ५८ हजार ५६० रु. एवढे आर्थिक सहाय्य केले आहे असे फिरोदिया यांनी सांगितले. यावेळी प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष शिवप्रसाद काळे, उपाध्यक्ष रुपेश भंडारी, संचालक श्रीपाद मुंगी, रमेश वराडे, सुनील तरवडे, संचालिका सौ.संगीता देऊळगावकर, सौ. शशिकला शेंडे उपस्थित होते.



रेव्हेन्यू सोसायटीच्या चेअरमनपदी संतोष मांडगे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. (छाया – बबलू शेख)

# रेव्हेन्यू सोसायटीच्या चेअरमनपदी संतोष मांडगे

नगर – रेव्हेन्यू ॲण्ड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंटस् गर्व्हमेंट सर्व्हटस् को–ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहमदनगर या संस्थेच्या नुकत्याच झालेल्या कार्यकारी मंडळ सदस्यांची सभा उपनिबंधक कार्यालय, सहकारी संस्थेचे सहकार अधिकारी अलताफ शेख यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यामध्ये चेअरमनपदी संतोष मांडगे यांची बिनविरोध निवड झाली. संतोष मांडगे, हे तहसिल कार्यालय पारनेर येथे ग्राम महसुल अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

संस्थेचे नुतन चेअरमन व व्हा. चेअरमन यांचे निवडीबद्दल माजी चेअरमन संदिप तरटे, व्हा. चेअरमन राजेश घोरपडे, संचालक सुरेश राऊत, बाबासाहेब दातखिळे, गणेश गर्कळ, प्रविण बोरुडे, प्रदिप चव्हाण, हरिभाऊ सानप, विजय हरिश्चंद्रे, प्रदिप अवचर, सनी जाधव, विकास मोराळे, संतोष ताठे संचालिका वृषाली करोसिया, सुनंदा मरकड, राज्य ग्राम महसुल अधिकारी संघटनेचे पदाधिकारी संतोष तनपुरे, गणेश जाधव, जिल्हा ग्राम महसुल अधिकारी संघटनेचे अध्यक्ष प्रशांत हासे, उपाध्यक्ष बाबासाहेब कदम, सरचिटणीस महेश सुद्रिक, माऊली ट्रस्टचे अध्यक्ष शेणकर तात्या, माऊली सभागृहाचे चेअरमन दिनकर घोडके, पदाधिकारी सुरेश जेठे, भूमि अभिलेख संघटनेचे नाशिक विभागीय अध्यक्ष रवि डिक्रुज, जिल्हाध्यक्ष राहुल मापारी, कोषागार संघटनेचे पदाधिकारी डॉ. मुकुंद शिंदे, जनरल सेक्रेटरी बाबासाहेब पालवे व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



भुईकोट किल्ला येथे जॉगिंग ट्रॅकवर पावसामुळे गेल्या अनेक दिवसांपासून वाढलेले गवत व कचरा घाणीचे साम्राज्य झाल्यामुळे नागरिकांनी सकाळी व संध्याकाळी जाणे मुश्किल झाले होते. नदीम जहागीरदार यांच्या प्रयत्नातून व लोकवर्गणीतून स्वच्छता करण्यात आली. याप्रसंगी आर्किटेक अर्शद शेख, हाजी मिर्झा अन्सार सर, आमीन दिवाणी, शहादा इलियास जहागीरदार, शुण्णू भाई, नवाब जहागीरदार. (छाया – बबलू शेख)

# कथाकथन स्पर्धेत हिंदवी शिंदे द्वितीय



नगर – कै. बाई इचरजबाई फिरोदिया स्मरणार्थ आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेत करण्यात आले होते.

या प्रसंगी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी शहरातील मुख्याध्यापक शिक्षक पालक संस्था पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण समारंभ पार पडला. इयत्ता तिसरीत शिकणारी हिंदवी प्रसाद शिंदे या विद्यार्थिनीने कथाकथन स्पर्धेत मोठ्या गटात शहर स्तरावर घेण्यात आलेल्या आंतरशालेय कथाकथन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. हिंदवी हिने संघर्ष ही बोधकथा सादर केली तिचे सादरीकरण, पाठांतर अत्यंत उत्कृष्ट होते. त्यामुळेच तिला द्वितीय क्रमांक दिल्याचे परीक्षकांनी सांगितले.

हिंदवीला तिचे वडील प्रसाद शिंदे, आई भाग्यश्री शिंदे तसेच इचरजबाई प्रशालेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. हिंदवी ही स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांची कन्या आहे.

# अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी



मराठी साहित्यातील अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७३ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी – अहिराणी – खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर – माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण – उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभेने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७३ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

## फंडू एसएमएस

ये ना समझना की भूल से
भी भूल जाएंगे हम।
याद रखना जिंदगी भर
दोस्ती निभाऐंगे हम।

इस जमाने में हजारो महफिले
सजी हैं और लाखो मेले है
लेकिन जहां तू नहीं वहाँ हम
बिलकुल अकेले हैं

मुस्कुराना कौनसा
मुश्कील काम है?
बस तुम्हें
सोचना ही तो है...

# नात्याला पूर्णविराम देणं योग्य?



माझी खूप चांगली मैत्रीण एकाच वेळी दोन मुलांना डेट करत आहे. आम्ही दोघी २७ वर्षांच्या आहोत. मी तिला गेल्या नऊ वर्षांपासून ओळखते. अशाप्रकारे दोन मुलांना झुलवत ठेवण्यात तिला काहीच वावगं वाटत नाही. पण आता मला तिच्याबद्दल पूर्वीइतकी आत्मियता, प्रेम वाटत नाही. तिचं कृत्य माझ्या तत्त्वांच्या विरोधात आहे. मी तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण ती ऐकायला तयार नाही. हे माझं आयुष्य आहे आणि आता कोणताही माणूस साधू–संत राहिलेला नाही, असं ती म्हणते. मी तिच्याशी असणारं मैत्रीचं नातं संपवू का, की तिच्या वागण्याकडे दुर्लक्ष करू? कृपया मार्गदर्शन कर.

**लाईफ गुरू**

– एक मैत्रीण म्हणून तू तिला समजावण्याचा पूर्ण प्रयत्न केलास. तू तुझी भूमिका पार पाडलीस. पुन्हा एकदा एकाच वेळी दोन मुलांना डेट करण्याचे दुष्परिणाम, संभाव्य धोके याबाबत तिला जागरूक कर. पण निर्णय तिच्यावर सोड. तू तिला मार्ग दाखवू शकतेस. पण कसं वागायचं हा निर्णय सर्वस्वी तिचाच आहे. तुला तिची खूप काळजी असेल तर समुपदेशकाचा सल्ला घेण्याचा पर्याय सुचवून बघ. पण अखेर आयुष्य तिचं आहे. तू तिला फक्त सल्ला देऊ शकतेस हे लक्षात घे. मैत्रीण या नात्याने तिच्याशी बोल. मदत कर आणि गरज पडली तर तिच्या पाठीशी उभी रहा. पण शेवटी प्रत्येक जण स्वत:चे निर्णय घेत असतो आणि त्याचे परिणामही त्यांनाच भोगावे लागतात हे लक्षात ठेव.

# जोश

**आजचा तरुण शेतीकडे फारसा वळत नाही. शहरी जीवनाचं आकर्षण असणाऱ्या सेल्फी, स्नॅपचॅटच्या जमान्यातल्या तरुणांना शेतात घाम गाळणं फारसं रुचत नाही. पण केरळमधला २१ वर्षांचा मोहम्मद शेहनशाह हा तरुण भातशेती करतोय. त्याबरोबर तो शिक्षणही घेत आहे. या कामामुळे सध्या तो चर्चेत आहे.**

# शेतीचा वारसा चालवण्यासाठी...

मोहम्मद शेहनशाह हा २१ वर्षांचा तरुण, केरळमधल्या पलक्कड जिल्ह्यातल्या चेरूपुल्लासेरी गावचा. तो भातशेती करतो. दुसरीकडे महाविद्यालयीन शिक्षणही सुरू आहे. सध्याचे तरुण सहसा शेतीकडे वळत नाहीत. त्यांना शहराचं आकर्षण असतं. कोणी गावाकडे रहायला तयार नाही. अशा परिस्थितीत शिक्षणासोबतच शेतीच्या वारसा जपणारा शेहनशाह अनेक अर्थांनी वेगळा ठरतो. तो एमईएस कॉलेजमध्ये बी कॉमच्या शेवटच्या वर्षाला आहे. घरातील थोरामोठ्यांना शेतात राबताताना बघतच तो मोठा झाला. त्यालाही शेतीत गोडी वाटू लागली. म्हणून शेतात काम करायचं असं त्याने ठरवलं. सोबत त्याला शिक्षणही घ्यायचं होतं. त्यानं या दोन्हींचा ताळमेळ साधायचं ठरवलं. वडील आणि आजोबांकडून त्यानं शेतीचं प्राथमिक तंत्र शिकून घेतलं.

**अचिव्हर**

वडील आणि आजोबांच्या मृत्यूपश्चात काही काळ त्यांचं शेत पडून होतं. पण आपल्या घराण्याची परंपरा सुरू ठेवायची हा विचार मनात आला आणि तो जोमाने कामाला लागला. सर्वप्रथम त्यानं कृषी अधिकारी व्ही. श्रीराम यांची मदत घेतली. त्यांनीही या तरुणाला मदत करायचं ठरवलं. त्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी ते बरेच झटले. शेतजमीन सुपीक करण्यासाठी त्याला कृषीभवनाची मोलाची साथ मिळाली.

याबाबत शेहनशाह सांगतो, गेल्या वर्षीपर्यंत मी शेतीकडे गांभीर्याने पाहिलं नव्हतं. पण पंचायत सदस्य, कुटुंबीय, गावकरी, मित्रमैत्रिणी यांनी पूर्ण पाठिंबा दिला. या पाठिंब्याच्या बळावरच मी शेतीला सुरूवात केली. भाताच्या नेहमीच्या बियाण्याच्या जागी नव्या जातीचा भात पेरायला सुरूवात केली. त्याचे चांगले परिणाम बघायला मिळत आहेत. कॉलेजला जायच्या आधी सकाळच्या वेळी तो शेतात राबतो. मग कॉजेलला जातो. आल्यावर पुन्हा दोन ते तीन तास शेतीत काम करतो. हा अनुभव खूपच छान असल्याचं त्याचं म्हणणं आहे. या अनुभवामुळे मी समृद्ध झालो आहे. शेतीचं नवं तंत्र बारकाईने आत्मसात करत आहे, असं हा युवक सांगतो. या कामामुळे तो परिसरात लोकप्रिय झाला आहे. पदवीनंतर त्याला मास्टर्स करायचं आहे. शेतीमध्ये उज्ज्वल भविष्य नाही असं म्हणून शहरांकडे वळणाऱ्या युवकांच्या भाऊगर्दीत शेहनशाहचं झपाटलेपण नक्कीच कौतुकास्पद म्हणावं लागेल.




# दाढीधारी मुलांसाठी...

सध्या दाढी ठेवण्याची फॅशन आहे. या पार्श्वभूमीवर दाढीच्या विविध प्रकारांवर एक नजर टाकू या.

✼ वरूण धवनने रेझर शार्प स्टबल प्रकारची दाढी ठेवली आहे. ही दाढी कोणावरही खुलून दिसते. अशाप्रकारे दाढी ठेवणं सोपं आणि सहज असतं. दाढीच्या देखरेखीसाठी फारशा ग्रुमिंग प्रोडक्ट्सची गरज नसते. फार मोठी दाढी ठेवायची नसेल तर स्टबल दाढी ठेवायला हरकत नाही. अशी दाढी ठेवण्यासाठी तुमच्याकडे चांगला ट्रिमर मात्र हवा.

✼ स्टबलपेक्षा काहीतरी वेगळं करायचं असेल पण मोठी दाढी नको असेल तर कार्तिक आर्यनसारखी छान ग्रुम केलेली दाढी ठेवता येईल. या दाढीसाठीही तुमच्याकडे ट्रिमर असायला हवा.

✼ तुम्ही शाहिद कपूरसारखी जाड दाढी ठेऊ शकता. अर्थात त्यासाठी तुम्हाला थोडी मेहनत करावी लागेल. पण या दाढीमुळे मिळणारा लूक पाहिला तर तुमची मेहनत वाया जाणार नाही हे नक्की! या दाढीसाठी तुमच्याकडे चांगला ट्रिमर हवा. त्याचबरोबर बिअर्ड शॅंपू तसंच चांगलं तेलही विकत घ्यावं लागेल.




✼ काहीतरी हटके ट्राय करायचं असेल तर रणवीर सिंहसारखी दाढी तुम्ही ठेऊ शकता.

**ग्रुमिंग**

अशा प्रकारची दाढी वाढवण्यापेक्षा ती टिकवून ठेवणं, देखरेख करणं जास्त आव्हानात्मक असतं. या दाढीच्या देखरेखीसाठी तुम्हाला दर्जेदार ग्रुमिंग प्रोडक्ट्स घ्यावी लागतील. फेस वॉश, बिअर्ड ऑईल, बिअर्ड शॅंपू यांचा वापर करावा लागेल. मिश्या ठेवल्या असतील तर त्यासाठी चांगलं वॅक्सही घ्या.

# ट्रेंडी जॅकेट्स फॉर विंटर

थंडीच्या या काळात वॉर्डरोबमध्ये ऊबदार जॅकेट्स असायलाच हवी. जॅकेट्समुळे गार वाऱ्यांपासून शरीराचा बचाव होतो त्याचबरोबर तुम्ही स्टायलिश आणि ट्रेंडी दिसता. वेगवेगळ्या प्रकारची, स्टाईलची आणि रंगांची जॅकेट्स तुम्ही कॅरी करू शकता. लेअरिंगसाठीही त्यांचा वापर करु शकता. स्टायलिश दिसण्यासाठी तुमच्याकडे योग्य प्रकारचं डेनिम किंवा लेदरचं जॅकेट असायला हवं. जॅकेट्सच्या विविध प्रकारांविषयी जाणून घेऊ या.



✼ या दिवसांसाठी तुमच्याकडे एखादं लेदर जॅकेट असायला हवं. योग्य कपड्यांसोबत कॅरी केलं तर या जॅकेटमुळे तुम्ही खूपच स्टायलिश आणि फॅशनेबल दिसता. महागडं असलं तरी लेदर जॅकेट पैसे वसूल लूक देतं याबद्दल कोणतीही शंका नाही.

**फॅशन पॅशन**

✼ बॉंबर जॅकेट हा प्रकारही हिट आहे. हा प्रकार तुम्हाला स्टायलिश लूक देतोच शिवाय त्याची फारशी देखभालही करावी लागत नाही. बॉंबर फार महाग नसतात. मुख्य म्हणजे हा प्रकार कोणत्याही कपड्यांवर शोभून दिसतो.

✼ डेनिम जॅकेट्स तर सर्वोत्कृष्ट ठरतात. विशेष म्हणजे ती आरामदायी आणि स्वस्त असतात. कॅज्युअल किंवा स्मार्ट कॅज्युअल लूकला चार चॉंद लावण्यासाठी तुम्ही एखादं डेनिम जॅकेट घ्यायलाच हवं.

✼ हूडीज हा प्रकारही हिट आहे. हूडीज आरामदायी आणि स्टायलिश असतात. हा प्रकार अगदी सहज कॅरी करता येतो. हूडीज कशावरही घालू शकता.



# दिल्लीतली खाद्यभ्रमंती

दिल्लीची थंडी प्रसिद्ध आहे. हिवाळ्यात दिल्लीला भेट द्यायचा विचार असेल तर खादाडी न करता परत येऊ नका. थंडीची मजा वाढवण्यासाठी दिल्लीत खाण्यापिण्याचे भरपूर पर्याय आहेत. दिल्ली आणि आसपासच्या परिसरात फिरणार असाल तर एक दिवस खाद्यभ्रमंतीसाठी ठेवा.

✼ जुन्या दिल्लीत चाट आणि इतर पदार्थ मिळतील. बेदमी पुरी, पाया निहारी हे प्रकार तुम्ही ट्राय करू शकता.

✼ दिल्लीत जाऊन छोले कुल्चे न खाल्लेला माणूस विरळाच. गरमागरम छोले कुल्चे नक्की ट्राय करा. शिवाय गार्लिक बटर छोले कुल्चे हा प्रकारही मस्त लागतो.

**भटकंती**

✼ थंडीत तळलेले पदार्थही खायला हवे. दिल्ली गेटला जा. तिथली कचोरी खूप प्रसिद्ध आहे. ती नक्की खा. पकोडे आणि गरमागरम बटाट्याची भाजी खाण्याचा पर्यायही तुमच्याकडे आहे.

✼ दिल्लीत प्रांतोप्रांतीचे पदार्थ मिळतात. नॉर्थ ईस्टचे पदार्थही तुम्ही ट्राय करू शकता. शप्त, थुक्पा आणि डिमसम्स खाऊन बघा.

# रीॲल्टीतील उज्ज्वल संधी

देशात पायाभूत सोयीसुविधा आणि बांधकाम क्षेत्राचा वेगाने विकास होत आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पांमुळे तज्ज्ञ मंडळींसाठी बऱ्याच नामी संधी उपलब्ध झाल्या आहेत. तुमच्याकडेही कल्पकता आणि नव्या गोष्टी शिकण्याची तयारी असेल तर या क्षेत्रात करीअर करता येईल. सेंटर फॉर इकॉनॉमिक बिझनेस ॲण्ड रिसर्चच्या अहवालानुसार २०३० पर्यंत भारत ही जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असेल. सहाजिकच रिअल इस्टेट क्षेत्रावरही सकारात्मक परिणाम होईल आणि कामाला वेग येईल. रीॲल्टीशी संबंधित अनेक क्षेत्रं आहेत. स्टील, सिमेंट, इलेक्ट्रॉनिक्स आदी क्षेत्रांच्या माध्यमातूनही तुम्ही देशाच्या प्रगतीशी जोडले जाऊ शकता. आजघडीला हे क्षेत्र प्रतिवर्षी ११ टक्के या वेगाने वाढत आहे. २०२० पर्यंत रीॲल्टी क्षेत्रात अशाच प्रकारचे वाढ होत राहणार आहे.

सध्या शेअर बाजारात ५० पेक्षा जास्त रीअल इस्टेट कंपन्यांची नोंद आहे. या कंपन्यांमध्ये युवकांना चांगली संधी मिळू शकते. या क्षेत्रात येण्यासाठी संवादकौशल्य तसंच मार्केटिंगचं तंत्र अवगत असायला हवं. रीॲल्टी बाजारपेठेची सविस्तर माहिती असायला हवी.

**वेगळ्या वाटा**

जमिनीच्या बाजारभावांची माहिती असायला हवी.

विद्यार्थी विज्ञान विषय घेऊन सिव्हिल किंवा स्ट्रक्चरल इंजिनिअरींग करू शकतात. इतर शाखांमधले विद्यार्थी सेल्स, मार्केटिंग आणि फायनान्समध्ये एमबीए करुन या क्षेत्रात येऊ शकतात. बीबीएचा पर्यायही तुमच्याकडे आहे. यासोबतच रिअल इस्टेट ब्रोकर सर्टिफिकेट कोर्स, डिप्लोमा, पीजी डिप्लोमा आणि एडव्हान्स डिप्लोमा यासारखे पर्यायही तुमच्याकडे आहेत.



# धकाधकीत फिटनेस जपा

दोस्तांनो, प्रचंड काम असूनही तुम्ही वजन नियंत्रणात ठेऊ शकता. यासाठी काही टिप्स फॉलो करायला हव्या.

✼ वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी शरीराला ठराविक कॅलरींची गरज असते. वजन कमी करायचं असेल तर तुम्हाला त्यापेक्षा कमी कॅलरीज घ्यायला हव्या.

✼ वजन कमी करण्यासाठी किती कॅलरीज हव्या हे ठरवण्याची एक सोपी पद्धत आहे. तुमच्या वजनाला २४ ने गुणायचं. वजन कमी करण्यासाठी तुम्ही तेवढ्या प्रमाणातच कॅलरी घ्यायला हव्या. म्हणजेच ८० किलो वजन असेल तर आहारात ८० गुणिले २४ म्हणजे १,९२० कॅलरीज असायला हव्या. वजन कमी होण्यास सुरूवात झाली की कॅलरीजच्या प्रमाणात बदल होईल.

**फिटनेस फंडा**

✼ चयापचय क्रियेचा वेग वाढवण्यासाठी तुम्हाला काही वेगळं करायची गरज नाही. तुम्ही गरजेइतक्याच कॅलरी घेणं महत्त्वाचं! कॅलरी काउंटिंग ॲप डाऊनलोड करा. त्यात दिवसभरातलं खाणं भरा. तुम्हाला कॅलरींचं प्रमाण कळेल. त्यानुसार कॅलरींचं प्रमाण कमी–जास्त करता येईल.

✼ तुम्हाला तीन वेळा खायचं असेल तर तीन वेळा खा. सहा वेळा खाणं जमत असेल तर त्याप्रमाणे आहाराची विभागणी करा.



✼ वजन कमी केल्यानंतर ते टिकवून ठेवण्यासाठी व्यायाम करायला हवा. कामाच्या वेळांमुळे नियमित जीममध्ये जाता येत नसेल तर आठवड्यातून दोन वेळा जा. कार्डिओसोबत वेट लिफ्टिंगही करा. संपूर्ण शरीराला व्यायाम देणारे व्यायामप्रकार निवडा. शरीराच्या प्रत्येक भागाला व्यायाम मिळाला पाहिजे हे लक्षात ठेवा.

✼ वजन कमी करण्यासाठी कोणतीही सप्लिमेंट्स घेऊ नका. त्यांचा काहीही उपयोग नसतो हे लक्षात घ्या.

## ॲप वर्ल्ड

### धोका फेक डिलिव्हरी स्कॅमचा


ऑनलाईन शॉपिंग ही आता सर्वसामान्य बाब बनली आहे. विविध साईट्वरून ऑनलाईन खरेदी केली जाते. मात्र अशा पद्धतीने खरेदी करताना फसवणूक होण्याची शक्यता असते. म्हणूनच प्रत्येक पाऊल जपून टाकायला हवं. सध्या फेक डिलिव्हरी किंवा कॅश ऑन डिलिव्हरीचा बहाणा करून युजर्सची फसवणूक होत आहे. हॅकर्स फ्लिपकार्ट किंवा ॲमेझॉनसारख्या ई कॉमर्स साईट्सचे डिलिव्हरी एजंट असल्याची बतावणी करून बॅंक खात्यातून पैसे गायब करत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी ई कॉमर्स कंपन्यांनी डिलिव्हरीच्या वेळी ओटीपी देऊन वस्तू घेण्याचं आवाहन केलं आहे. मात्र यामुळे डोकेदुखी वाढली आहे. हॅकर्स किंवा स्कॅमर्स डिलिव्हरी एजंट बनून तुमच्या दाराशी येतात. वस्तू देण्याआधी ओटीपी विचारतात. या जाळ्यात अडकून आपण ओटीपी दिला तर स्कॅमर आपल्या फोनचं क्लोन तयार करतात. सातत्याने ऑनलाईन शॉपिंग करणाऱ्यांना लक्ष्य केलं जात आहे. त्यामुळे तुम्ही जपून रहायला हवं.




## स्मार्ट टिप्स

### लॅपटॉपची बॅटरी वाचवण्यासाठी...

लॅपटॉपची बॅटरी वाचवण्यासाठी तुम्ही काही टिप्स फॉलो करू शकता. त्यासाठी पॉवर सेटिंग्जमध्ये जाऊन बॅटरी किती काळ चार्ज राहणार हे जाणून घ्या. काही सेटिंग्ज एनेबल करूनही बॅटरी वाचवता येईल. काही ॲप्स बंद करून घ्या. मॅकबुक असेल तर तुम्ही पॉवर नॅप फीचरचा वापर करू शकता. क्लाउड स्टोरेज तसंच व्हिडिओ प्लेअर्स शटडाउन करून घ्या. यामुळे लॅपटॉपची बॅटरी वाचेल.



## स्मार्ट फन





### असा मिळवा बोकेह इफेक्ट

स्मार्टफोनच्या कॅमेऱ्यातून काढलेल्या फोटोला तुम्ही बोकेह इफेक्ट देऊ शकता. या इफेक्टमुळे फोटोचं बॅकग्राउंड ब्लर करता येतं. अर्थात त्यासाठी फोनमध्ये ड्युअल कॅमेरा असायला हवा. पण सिंगल कॅमेरा असेल तरी तुम्ही बोकेह इफेक्टचा वापर करू शकता. यासाठी आफ्टर फोकस ॲपचा वापर करावा लागेल. हे ॲप डाउनलोड करून बोकेह इफेक्ट मिळवता येईल.

## बी ॲलर्ट

### धोकादायक ॲप्स

गुगलने प्ले स्टोअरमधून २२ ॲप्स डिलिट केली आहेत. या धोकादायक ॲप्समुळे युजर्सचा डाटा चोरीला जाऊ शकतो. तुमच्याकडे यातली काही ॲप्स असतील तर ती लगेच डिलिट करून टाका. कोणती आहेत ही ॲप्स? स्पार्कल फ्लॅशलाईट, स्नेक अटॅक, मॅथ सॉल्व्हर, शेप सॉर्टर, झोंबी किलर, टेक अ ट्रिप, स्पेस रॉकेट, निऑन पॉंग, जस्ट फ्लॅशलाईट, टेबल सॉकर, जेली स्लाईस, ॲनिमल मॅच यापैकी काही ॲप्स तुमच्याकडे असतील तर फोनमध्ये ठेऊ नका.



# दिव्यांगांना स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी दिव्यदृष्टी संस्थेच्या दिव्यांगांची धडपड स्तुत्य आहे

**माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांचे प्रतिपादन; जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग उद्योजविकास, आत्मनिर्भर कार्यशाळा**



अहिल्यानगर येथे जागतिक दिव्यांग दिवासानिमित्त आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन प्रसंगी दीप प्रज्वलन करताना माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे व अन्य ( छाया : संजय ठोंबरे)

नगर – आपल्या दिव्यांग बांधवांना आत्मनिर्भर बनवून स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी चाललेली दिव्यांगांच्या दिव्यदृष्टी संस्थेच्या दिव्यांगांची धडपड डोळस समाजापेक्षा ही स्तुत्य आहे. या संस्थेस सीएसआर फंडातून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे यांनी दिली. १ डिसेंबर रोजी जागतीक दिव्यांग दिवसानिमित्ताने आयोजित दिव्यांग उद्योजकता विकास, आत्मनिर्भर कार्यशाळाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

३ डिसेंबर हा दिवस जागतिक दिव्यांग दिन म्हणून जगभरात सर्वत्र साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून अहिल्यानगर येथील दिव्यदृष्टी संस्थेतर्फे १ डिसेंबर रोजी दिव्यांग उद्योजकता विकास, आत्मनिर्भर कार्यशाळा पार पडली. अहिल्यानगर येथील मार्केट यार्ड मधील शेतकरी निवासातील आठरे पाटील सभागृहात सकाळी १०.३० वाजता उद्घाटन समारंभ डॉ. सर्जेराव निमसे यांचे हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी अहमदनगर कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. प्रीतम बेदरकर, इतिहास विभाग प्रमुख डॉ. विजय कदम, लेखक, वक्ते, उद्योजक एन बी धुमाळ, युवा उद्योजक संकेत कुलट, भाजीपाला व फळावळ अडत्यांची असोसिएशनचे अध्यक्ष अशोक लाटे, विजय कोथिबीरे जिल्हा उदयोग केंद्राचे व्यवस्थापक खलील शेख, दिव्यदृष्टी दिव्यांग संशोधन व विकास संस्थेचे अध्यक्ष कृष्णा तवले उपस्थित होते.

कार्यशाळेचा सर्व प्रवर्गातील दिव्यांगनी लाभ घेतला. सर्व प्रवर्गातील दिव्यांगांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती कार्यशाळेत दिली गेली.

कार्यशाळेत जिल्हा उद्योग केंद्रांचे व्यवस्थापक यांनी जिल्हा उद्योग केंदा मार्फत राबविल्या जाणाऱ्या कर्ज योजनाची व त्याची प्रक्रिया या संबंधी सविस्तर माहिती दिली.

कौशल्य विकास विभागाचे राज्य समन्वयक मच्छिंद्र उर्कीड यांनी राज सरकारच्या, अपंग कौशल्य विकास योजनाची माहिती दिली.

कौशल्य विकास विभागाचे केंद्रीय समन्वयक वसीम पठाण यांनी केंद्र सरकार तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना व प्रशिक्षण कार्यक्रमा विषयी माहिती दिली.

अहिल्यानगर महापालिका दिव्यांग विभागाच्या सरला मोहळ यांनी महानगरपालिकेतर्फे पाच टक्के निर्धा अंतर्गत सामाजिक अर्थ सहाय योजनेचा लाभ घ्यावा असे आवहान केले.

लेखक व वक्ते एन बी धुमाळ यांनी दिव्यांतराना उद्योजक बनण्याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

प्राप्तविकात दिव्य दृष्टि संस्थेचे अध्यक्ष कृष्णा तवले यांनी सांगितले की लवकरच दिव्यांग संगणक प्रशिक्षण व कौशल्य विकास केंद्र सुरु करण्यात येणार आहे. या केंद्रा साठी समाजातील दानशुर व्यक्ति कडून आर्थिक व वस्तु स्वरूपात मदतीचे आवाहन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. बेदरकर, डॉ. कदम, संकेत कुलट, अशोक लाटे, विजय कोथिबीरे यांनी मार्गदर्शन केले.

उद्योजक संकेत कुलर यांनी संस्थेस सात संगणक भेट दिले. कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे व सचिव अभय भिसे यासह संचालक मंडळाने कार्यशाळेस सभागृह उपलब्ध करून दिले. विजय कोथिंबीर यांनी चहा, नास्ता व दुपारचे भोजनाची व्यवस्था केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिव्यदृष्टीचे सुनिल बाचकर, निलेश शिंदे, धवन उमरेडकर, सुभाष शिंदे, अमोल चव्हाण आदींसह पदाधिकारी व स्वयसेवक स्वयम सेवक राहुल वाघमोड, प्रतिक्षा परभणे, श्रेया फिरोदिया, ऋषिकेश सोनार आदिनी परिश्रम घेतले.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटी आयोजित कै. बाई इचरजबाई फिरोदिया स्मरणार्थ विविध आंतरशालेय स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला. (छाया – उदय जोशी)

# आंतरशालेय स्पर्धेत सावेडीतील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेचे यश

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटी आयोजित, कै. बाई इचरजबाई फिरोदिया स्मरणार्थ विविध आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सावेडीतील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेचे (प्राथमिक विभाग) घवघवीत यश संपादन केले. वरील स्पर्धांमध्ये नगर शहर व परिसरातील सुमारे २२ शाळांमधील ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

इयत्ता पहिली, दुसरी तसेच इयत्ता तिसरी, चौथी अशा दोन गटांमध्ये कथाकथन, चित्रकला, नृत्य, गायन, फॅन्सी ड्रेस व सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या खालील विद्यार्थ्यांनी बक्षिसे पटकावली. गट क्रमांक एक मधून कु. ऋचा अतुल शेवगावकर (कथाकथन स्पर्धा प्रथम क्रमांक), कु. आराध्या अनिल कराळे (चित्रकला स्पर्धा उत्तेजनार्थ प्रथम), कु. अन्वी प्रभू उरणकर (फॅन्सी ड्रेस स्पर्धा तृतीय क्रमांक), कु. स्वरा महेश मरकड (नृत्य स्पर्धा उत्तेजनार्थ प्रथम) तसेच गट क्रमांक दोन मधून कु. आस्था आनंद भंडारी (कथाकथन प्रथम विभागून), चि. वरद प्रवीण दळवी (कथाकथन उत्तेजनार्थ द्वितीय), कु. अनुराधा दीपक जाधव (फॅन्सी ड्रेस प्रथम), कु. जान्हवी अभिजित जगताप (फॅन्सी ड्रेस उत्तेजनार्थ प्रथम), चि. रिषभ संजय नागरगोजे (फॅन्सी ड्रेस उत्तेजनार्थ द्वितीय), कु. कृपाक्षी कल्पेश अदवन्त (गायन द्वितीय), चि. साईराज कल्याण मुरकुटे (गायन तृतीय), कु. स्वरा उदय सभारंजक (रांगोळी स्पर्धा तृतीय)

सर्व मार्गदर्शक शिक्षक व यशस्वी विद्यार्थी यांचे प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, श्री समर्थ विदया प्रसारक मंडळाचे सचिव व शालेय समिती चेअरमन सुरेश क्षिरसागर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व संस्थाचालक यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस खूप शुभेच्छा दिल्या.

# रस्त्यावरील खड्डा ठरतोयं नागरिकांसाठी जीवघेणा

**तातडीने खड्ड्यावरील झाकण बदलण्याची महानगरपालिकेकडे मागणी**

नगर – शहरातील मध्यवर्ती भाग असलेल्या प्रभाग क्रमांक ११ मधील नुकताच काँक्रिटीकरण झालेल्या रस्ता नालबंदखुंट चौक ते पिरशाहखुंट चौक या रस्त्यामध्ये मोठा खड्डा पडला असून तो जीवघेणा ठरत आहे. मुख्य बाजारपेठ, विविध शाळा व इतर महत्त्वाच्या ठिकाणी जोडण्याकरिता हा रस्ता वापरला जातो त्यामुळे या रस्त्यावर शाळकरी मुलांची व नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे अपघाताला निमंत्रण मिळत असून व मोठी हानी होण्याची शक्यता नकारू शकत नाही.

ठेकेदाराने केलेले काम व त्यावर बसवलेले झाकण अत्यंत निकृष्ट दर्जाचे साध्या पत्र्याचे असल्याने तो पत्रा खाली खचून गेला आहे त्यामुळे त्याच्यावर मोठा खोल खड्डा पडला आहे. येणाऱ्या व जाणाऱ्या नागरिकांना या खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यांना दुखापतीला व मणक्याच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. महापालिका प्रशासन व आयुक्तांनी दखल घेऊन अपघात टाळण्याकरिता खड्ड्यांचे झाकण त्वरित बदलून दुसरे बसविण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार अल्पसंख्याक विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष अलतमश जरीवाला यांनी केली आहे.



सुगम संगीत गायन स्पर्धेत अनामप्रेमच्या गायक विद्यार्थ्यांचे पारितोषिक देवून अभिनंदन केले.

# सुगम संगीत गायन स्पर्धेत अनामप्रेमच्या गायक विद्यार्थ्यांचे सुयश

नगर – पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती त्रिशताब्दी महोत्सवाच्या अनुशंगाने संस्कार भारती पश्चिम प्रांत, अहिल्यानगर समितीने १ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय सुगम संगीत गायन स्पर्धेचे आयोजन केले होते.

ही स्पर्धा १ डिसेंबर रोजी मधुरंजनी सभागृह, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर येथे झाली. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली होती.

या स्पर्धेमध्ये अनामप्रेम संस्थेमधील एकूण १० अंध विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेमध्ये १५ ते ५० या वयोगटात अनामप्रेमचा अंध विद्यार्थी अंकुश सुरेश खंडेलोटे याने अतिशय सुंदर गायन करत दुसरा क्रमांक पटकाविला. अंकुशच्या यशामागे अनामप्रेमचे संगीत शिक्षक सौदागर लोंढे यांचा मोठा वाटा आहे. अनामप्रेमचे अजित माने, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. रवींद्र सोमाणी, डॉ. मेघना मराठे, अविनाश बोपर्डीकर, नितीन थाडे, अनिल गावडे व सीए अशोक पितळे यांनी अंकुशचे कौतुक केले आहे.

# मनमोहक कृष्ण लीलांनी मोहरले ‘रामकृष्ण’चे स्नेहसंमेलन



सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व श्री मोहनलाल रामअवतार मानधना ज्युनिअर कॉलेजमध्ये यावर्षीही पुन्हा अध्यात्मिक संकल्पनेवर आधारित स्नेहसंमेलन साजरे झाले.

नगर – श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन संचलित सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व श्री मोहनलाल रामअवतार मानधना ज्युनिअर कॉलेजमध्ये यावर्षीही पुन्हा अध्यात्मिक संकल्पनेवर आधारित स्नेहसंमेलन साजरे झाले. शाळेच्या स्नेहसंमेलनाची सुरुवात नर्सरी ते इयत्ता दुसरी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमाने करण्यात आली. यामध्ये नर्सरी एलकेजी व युकेजीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी गाण्यावर नृत्य सादर केले. त्यानंतर इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी तारे जमीन पर किसने उतारे व शिक्षा अभियानावर आधारित नृत्य सादर केले. तसेच इयत्ता दुसरी च्या विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अतिवापरामुळे कसे दुष्परिणाम होतात हे आपल्या नृत्यातून दाखविले तसेच पर्यावरणावर आधारित वृक्षतोड करू नये असा संदेश आपल्या नृत्यातून दिला.

प्रथेप्रमाणे औपचारिक कार्यक्रम झाला. यामध्ये आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व संस्थेचे सचिव डॉ. शरद कोलते आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. शरद कोलते यांचा परिचय संपदा देशपांडे यांनी करून दिला व त्यानंतर डॉ. शरद कोलते यांना श्रीगोपाल धूत यांनी श्रीफळ पुष्पगुच्छ व शाल देऊन सन्मानित केले. तसेच श्रीगोपाल धूत यांचा परिचय सौ. प्रांजली गुजर यांनी करून दिला व श्रीगोपाल धूत यांना संस्थेचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना यांनी श्रीफळ पुष्पगुच्छ व शाल देऊन सन्मानित केले. यानंतर संस्थेचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना व राजेश झंवर, संस्थेचे सहसचिव बजरंग दरक आणि संस्थेचे विश्वस्त व सर्व पदाधिकारी यांना पुष्पसुमने देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये शालेय वार्षिक मासिकाचे अनावरण करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या सौ. राधिका जेऊरकर यांनी वार्षिक अहवाल सादर केला.

तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. शरद कोलते यांनी आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये ते म्हणाले की सर्वप्रथम प्राथमिक विभागाच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे त्यांनी कौतुक करून शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आयुष्य एक बासरी आहे त्यात आपणच सूर भरून जीवन संगीतमय करायचे असते विद्यार्थ्यांनी स्वतःची क्षमता ओळखून स्वतःचा विकास साधायचा असतो विविध गोष्टीतून त्यांनी विद्यार्थ्यांना संदेश दिला.

श्रीगोपाल धूत यांनी शाळेला संबोधित करताना विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांचे वर्षभरातील परिश्रम आणि यशाबद्दल अभिनंदन करून सुरुवात केली.

वैयक्तिक वाढीचा पाया म्हणून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, विद्यार्थ्यांना जिज्ञासा आणि दृढनिश्चयाने ज्ञानाचा पाठपुरावा करण्यास प्रोत्साहित केले. यशस्वी जीवनाला आकार देण्यासाठी शिस्त, सचोटी आणि दयाळूपणा हि मूल्ये महत्वाची आहेत असेही त्यांनी भाषणात सांगितले.

विद्यार्थ्यांना आव्हानांवर मात करण्यासाठी, नवीन संधी स्वीकारण्यासाठी आणि जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्यास प्रेरित केले. गतवर्षी गीत रामायणातील गाण्यातून मंत्रमुग्ध करणाऱ्या स्नेहसंमेलनाच्या अभूतपूर्व यशानंतर श्री रामकृष्ण संस्थेने यावर्षीच्या स्नेहसंमेलनात भगवान श्रीकृष्णांच्या जन्मापासून ते अर्जुनाला भगवद्गीतेद्वारे उपदेश करण्यापर्यंतच्या कृष्ण जीवनातील प्रसंगांचं नाट्य, नृत्य , संगीताच्या माध्यमातून अत्यंत मनमोहक दर्शन घडवलं. विद्यालयातील इयत्ता तिसरी ते बारावी पर्यंत ३५१ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेऊन आपल्या कलागुणांनी आणि उत्कृष्ट अभिनयाने सर्वांना द्वापार युगात नेले.

देवकी वसुदेव विवाह, बंदी गृहात कृष्णजन्म, पूतना वध, विश्वदर्शन, माखनचोर, कालिया मर्दन, गोवर्धन पूजा, रासलीला, होळी, कंसवध, रुक्मिणी हरण, कृष्ण सुदामा भेट, भगवद् गीता उपदेश आशा भगवान श्रीकृष्णांच्या आयुष्यातील प्रसंगाचं विद्यालयातील विद्यार्थ्यांनी हुबेहूब सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली विद्यालयाच्या उपप्राचार्या संपदा देशपांडे यांच्या संकल्पनेतून आणि लेखणीतून साकारलेल्या मनमोहक कृष्णलीलांच्या उत्कृष्ट सादरीकरणासाठी प्राध्यापक प्रसाद बेडेकर, शैलेश देशमुख यांनी दिग्दर्शन केले विद्यालयातील श्रेयकुमार गुंडू, मुग्धा देवकर, रोथेल लोंढे, शिल्पा मुळे, अंजना पंडित, पूजा म्हस्के, प्रतीक्षा येनगंदूल यांसह सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मेहनतीतून ही उत्कृष्ट कलाकृती सादर करण्यात आली तसेच शाळेतील सर्व शिक्षकांच्या मेहनतीने हा कार्यक्रम यशस्वी पार पडला.

इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देण्याबरोबरच विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनातून भारतीय संस्कृतीची ओळख करून देणे आणि संस्कारक्षम विद्यार्थी घडवणे ही विद्यालयाची परंपरा कायम ठेवल्याबद्दल पालक वर्गातून आनंद आणि समाधान व्यक्त होत आहे.

यानंतर शाळेतील यशवंत गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाची सांगता संस्थेचे सहसचिव श्री बजरंग यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या समन्वयक सुषमा उजागरे यांनी केले. कार्यकारणी सदस्य नंदलाल मनियार, पुरुषोत्तमभाई पटेल, श्रीगोपाल जाखोटिया, रविंद्र गुजराथी, नंदकिशोर शहा, शरद पल्लोड, रामसुख मंत्री, श्यामसुंदर सारडा, मधुसूदन सारडा, अरुण झंवर, संस्थेचे सदस्य मगनभाई पटेल उपस्थित होते. संस्थेच्या इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. संस्थेचे उपाध्यक्ष व शाळा समिती अध्यक्ष नंदकुमार झंवर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



संचेती हॉस्पिटल यांनी पुण्यातील पहिला स्मार्ट वॉर्ड उपक्रम सुरु केला आहे. याप्रसंगी उपस्थित डोझीचे भारतातील प्रमुख कौशल पांड्या आदी.

# संचेती हॉस्पिटलमध्ये ‘स्मार्ट वॉर्ड’ उपक्रम

पुणे – संचेती हॉस्पिटल यांनी पुण्यातील पहिला स्मार्ट वॉर्ड उपक्रम सुरू केला आहे, जो डोझीच्या स्वदेशी AI–आधारित रिमोट मॉनिटरिंग सिस्टम (RMS) आणि अर्ली वॉर्निंग सिस्टम (EWS) द्वारे समर्थित आहे.

डोझीच्या साहाय्याने आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांना हृदयाचे ठोके, रक्तदाब, एसपीओ२ पातळी, तापमान आणि ईसीजी यांसारख्या म हत्त्वाच्या वैद्यकीय बाबींवर दुरस्तपणे देखरेख ठेवता येईल. डोझीच्या अर्ली वॉर्निंग सिस्टिम (ईडब्ल्यूएस)च्या सहाय्याने या महत्त्वाच्या बाबींचे कल लक्षात घेऊन मागोवा ठेवतो येतो आणि रूग्णाच्या वैद्यकीय परिस्थितीत बिघाड झाल्यास आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना सूचना मिळून योग्य वेळेत गरजेनुसार हस्तक्षेप करता येतो. डोझी तर्फे एआय आधारित बॅलिस्टोकार्डिओग्राफी (बीसीजी) चा वापर केला जातो, ज्यामुळे कॉन्टॅक्टलेस मॉनिटरींग शक्य होते. डोझीच्या तंत्रज्ञानाला पेटंट प्राप्त झाले असून हे तंत्रज्ञान भारतात विकसित केले गेले आहे. या अभिनव तंत्रज्ञानाचा रूग्ण सुरक्षिततेवर, वैद्यकीय परिणामांवर आणि कामकाजाच्या कार्यक्षमतेवर लक्षणीय सकारात्मक प्रभाव पडतो.

संचेती समुहाचा रूग्णकेंद्रित दृष्टीकोन आणि स्मार्ट आणि शाश्वत आरोग्य सेवेसाठी कटिबध्दता ही अद्ययावत रूग्णसुरक्षा साधने उपलब्ध करून देण्याच्या डोझीच्या ध्येयाशी सुसंगत आहे. या धोरणात्मक एकीकरणामुळे सतत देखरेख आणि योग्य वेळेत उपचार हे एक मानक प्रस्थापित होईल, ज्यामुळे परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा होतील, असे मत डोझीचे भारतातील प्रमुख कौशल पांड्या यांनी सांगितले.

संचेती ग्रुप हे नैतिक पध्दती आणि विश्वासार्हता यासाठी ओळखले जाते आणि यामुळेच जागतिक दर्जाच्या आर्थोपेडिक सेवांमध्ये अग्रस्थानी आहे. डोझीच्या अद्ययावत तंत्रज्ञानामुळे या वचनबध्दतेला आणखी बळ मिळणार असून संचेतीचे स्थान रूग्ण व आरोग्य सेवा प्रदात्यांसाठी शाश्वत व अभिनव पध्दतींचे ठिकाण म्हणून अधिक दृढ झाले आहे.

# एकनाथ शिंदेंचा सरकारमध्ये ‘योग्य सन्मान’ व्हायला हवा



नगर – २०१९ साली भरकटलेल्या हिंदुत्वाला पुन्हा योग्य दिशा देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभुतपूर्व धाडस केले आणि गेली दोन वर्षे प्रचंड ताणतणावाखाली असतानाही महाराष्ट्राचा राज्य कारभार अतिशय कौशल्यपूर्वक चालवल्यामुळेच महायुतीला अभुतपूर्व यश मिळाले, असे प्रतिपादन कै. धर्मवीर जगदीश भोसले यांचे निकटचे सहकारी राजेंद्र कलमदाणे यांनी केले आहे. त्यामुळे नव्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांचा योग्य सन्मान राखला जावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

२०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी शंभरावर आमदार असलेल्या आणि केंद्रात सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पक्षाला एका समविचारी, देशात यश मिळवलेल्या पक्षाला डावलून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर आघाडी करुन मुख्यमंत्री झाले. परंतु त्यांच्या या निर्णयाने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंना दैवतासमान मानणारा सच्चा कडवा शिवसैनिक व्यथित झाला, दुखावला. या सरकारच्या स्थापनेपासूनच हे सच्चे, कडवे शिवसैनिक अस्वस्थ होते, वृष्ट होते. त्यानंतर दोन–अडीच वर्षांनी जेव्हा १९ जूनला शिवसेनेचा वर्धापनदिन झाला त्यानंतर साधारण दोन दिवसांनी अचानक बातमी धडकली एकनाथ शिंदे मोठा आमदारांचा गट घेऊन सुरतला गेले. तिथून पुढे गुवाहाटीत दाखल झाले. महाराष्ट्रात या घटनेने प्रचंड खळबळ उडाली. ठाकरे सरकार अल्पमतात आल्यामुळे उद्धव ठाकरेंनी राजीनामा दिला आणि भारतीय जनता पक्षाने शिंदेंबरोबर सरकार स्थापन करुन त्यांचा योग्य सन्मान करीत मुख्यमंत्री पद त्यांना बहाल केले. परंतु आमदार अपात्रता प्रकरणी कोर्ट, कचेऱ्या सुरू असल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांचे सहकारी आमदार, मंत्री यांनी तसेच सेना–भाजप युतीचे समर्थक कडव्या शिवसैनिकांनी अतिशय प्रचंड तणाव अनुभवला. एवढे सगळे ताणतणाव असतानाही मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने अतिशय उत्कृष्टरित्या राज्य कारभार चालवला. २०२४ च्या विधानसभा रणसंग्रामात जनतेने भरभरुन मते देवून अभुतपूर्व यशस्वी केले. मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रचंड धाडस करुन दिशा भ्रष्ट झालेले हिंदुत्व परत योग्य मार्गावर आणल्यामुळेच हे दैदीप्यमान यशाचे अतिशय सुंदर चित्र देशाला पहायला मिळाले. त्यामुळे नव्या सरकारमध्ये मुख्यमंत्री आणि त्यांच्या धाडसी सरदारांचा उचित सन्मान नव्या सरकारमध्ये केला जावा, असे आवाहन राजेंद्र कलमदाणे यांनी केले आहे.

